


# जॉन केनेडी

म. ग्रं. सं. ठाणे,
क्र. १२५४८

निर्मला कुलकर्णी

IRBK-0112548

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन पुणे ९

## निवेदन

'देशविदेशचे नेते' या मालेतील पाचवे पुस्तक 'जॉन केनेडी' आम्ही सादर करीत आहोत. ज्यांच्याबद्दल मराठीमध्ये चरित्रवजा वा अन्य कमी लिहिले गेले आहे अशा देश-विदेशांतील सुप्रसिद्ध व्यक्तींची चरित्रे या मालेतून आम्ही प्रसिद्ध करणार आहोत. कुमार विद्यार्थी-वर्गासाठी ही पुस्तके असल्याने यांत त्या व्यक्तीच्या हयातीतील राजकारण, तत्सम गोष्टी व त्यांवरील मते हे कटाक्षाने टाळले आहे. विद्यार्थ्यांपुढे आदर्श म्हणून ठेवण्याइतपत चरित्रातील जो भाग तोच आमच्या चरित्रलेखकांनी येथे रंगविला आहे. त्या दृष्टिकोनातून वाचल्यावर ही पुस्तके कितपत आवडली हे आमच्या कुमार-वाचकांनी व त्यांच्या पालकांनी आम्हांस कळविल्यास सुधारणा करणे इष्ट होईल. 'थोरांच्या चरित्रावर आधारित एकांकिका' ही आमची योजना जशी कुमार-वाचकांना आवडली तसे या योजनेचेही सहर्ष स्वागत होईल अशी आम्ही अपेक्षा करीत आहोत.

प्रकाशक

IRBK-0112548

IRBK-0112548

# अनुक्रम


१. मुलाचे पाय पाळण्यात १

२. यशोमंदिराच्या पायरीवर १२

३. प्रगतीची पाऊलवाट २३

४. विश्वाचे विश्वासस्थान ३४

५. " ओ......नो " ४४

६. आणि आकाशच कोसळले ५४

क्रमांक...33९६...नोंद दि. २४।५।६

# १

## मुलाचे पाय पाळण्यात

काही माणसे जन्मजात मोठी असतात. काही आपल्या गुणांनी मोठेपण मिळवितात, तर काहींना इतर माणसे मोठे बनवितात. यातले श्रेष्ठ कोण आणि कनिष्ठ कोण हे ठरविण्याच्या मागे लागणे म्हणजे वेळ घालवणे आहे. कारण काही झाले तरी त्या माणसाचे मोठेपण नाकारता येत नाही.

परंतु कधी कधी असेही होते की, एखादी व्यक्ती अतिशय भाग्याची निपजते. त्या व्यक्तीला मोठेपणा तिन्ही मार्गांनी प्राप्त होतो. मात्र युगायुगाने अशी व्यक्ती क्वचित्च जन्माला येते. अशा विरळा महापुरुषांपैकी एक जॉन केनेडी. अमेरिकेच्या इतिहासात अब्राहाम लिंकनचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. उदारमतवादी, मानवाच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी लढणारा, समाजातली विषमता नष्ट करण्याच्या प्रयत्नात स्वतःचे बलिदान करणारा अब्राहाम लिंकन अमेरिकेच्याच नव्हे, तर मानवजातीच्या इतिहासात श्रेष्ठ मानला गेला आहे. याच परंपरेतला अमेरिकेचा आणखी एक अध्यक्ष जॉन केनेडी.

जॉन केनेडीच्या घरात सर्व दृष्टींनी समृद्धी होती. त्याचे आजोबा, वडील यांच्या रक्तातच राजकारणाची आवड होती असे म्हणायला हरकत नाही. त्यांचे घर म्हणजे राजकारणाचा एक अड्डाच होता. जॉनचे आजोबा

निवडणूक अधिकारी होते. त्यांच्या घरात नेहमी राजकारणी लोक, कमिशनर, संसदेचे सदस्य, सरकारी अधिकारी यांची वर्दळ असायची. राजकारणासंबंधी त्यांच्या आपसात नेहमी गप्पा चालत. या गप्पा इतक्या मोठमोठ्याने चालत की, लोकांना तेथे भांडणतंटा चालू आहे की काय असे वाटे. त्यामुळे नाही म्हटले तरी घरातल्या प्रत्येक माणसाच्या कानावर ही चर्चा पडत असे. जॉनच्या वडिलांचे नाव ज्यो केनेडी. ते लहान होते तरी या मोठमोठ्या मंडळींत लुडबुडत असत. हा चुणचुणीत पोरगाही सगळ्या पाहुण्यांचा अगदी लाडका होता. ज्यो केनेडीला राजकारणाची चर्चा ऐकायला आवडायची, त्याचबरोबर त्याला बेसबॉल हा खेळही आवडत असे आणि या खेळांच्या सामन्यात तो नेहमी भाग घेत असे. केनेडी कुटुंब प्रथम बोस्टन शहरात रहात होते.

याच शहरात फिट्जेराल्ड या नावाचे आणखी एक घराणे होते. केनेडी आणि फिट्जेराल्ड या दोन्ही घराण्यांत नावापुरती मैत्री होती, पण बरेचसे भांडण होते. इतके की, शेक्सपीअरच्या नाटकातल्या रोमिओ-जुलिएटच्या घराण्यांप्रमाणे ही घराणी समजली जात. केनेडी आणि फिट्जेराल्ड या दोन घराण्यांतही त्या नाटकातल्यासारखा प्रसंग उद्भवला. कारण फिट्जेराल्ड घराण्यातल्या रोझ नावाच्या सुंदर मुलीचे आणि ज्यो केनेडीचे एकमेकांवर प्रेम जडले. सुदैवाने त्यांच्या विवाहात मात्र काही अडथळे आले नाहीत. त्यांचे लग्न थाटामाटात पार पडले.

या लग्नानंतर एक वर्षाने रोझ केनेडीला मुलगा झाला. याचे नाव धाकटा ज्यो असे ठेवले. त्या लाललाल, गोऱ्यापान चिमण्या गाठोड्याकडे वडिलांनी पाहिले. ते अभिमानाने म्हणाले, " हा मुलगा अमेरिकेचा अध्यक्ष होईल. केनेडी कुटुंबाचं नाव उज्ज्वल करील. "

पण अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी केनेडीच्या कुटुंबात जन्माला येणारे नररत्न हे नव्हते. आपल्या पित्याचे महत्त्वाकांक्षी बोल पुरे करणारा मुलगा आणखी दोन वर्षांनी जन्माला आला. याचेच नाव जॉन ऊर्फ जॅक् केनेडी. ही भावंडे एकूण सहा. तीन मुलगे आणि तीन मुली. सर्व

भावंडांचे एकमेकांवर अतोनात प्रेम. सर्वच मुलांना राजकारणाची, तशीच इतिहासाची उपजत आवड होती. बोस्टनमधली ऐतिहासिक स्थळे बघायला त्यांना फार आवडत. बोस्टन टी पार्टी, जिथे यात्रेकरू जहाजातून उतरले ती जागा. ही त्यांच्या अतिशय आवडीची स्थळे होती. अमेरिकेत वसाहत निर्माण होत असताना इंग्लंड आणि अमेरिका यांच्यात युद्ध झाले होते. या युद्धात ब्रिटिश सैनिकांच्यावर लहान लहान मुलांनी एका उंच जागेवरून मोठमोठे दगड ढकलून दिले होते. ही जागाही बोस्टनमध्येच आहे. अशी ही इतिहासप्रसिद्ध ठिकाणे ते नेहमी अभिमानाने पहात. या जागांचा इंच न् इंच त्यांच्या अगदी चांगला परिचयाचा झाला होता.

राजकारण आणि इतिहास यांच्याबरोबर या सर्व मुलांवर धर्माचे संस्कारही घरात होत असत. जॉन केनेडीच्या आईची धर्मावर अतिशय श्रद्धा होती. ती मुलांना दररोज चर्चमध्ये नेत असे. सर्वसाधारणपणे बरीच माणसे फक्त रविवारी चर्चमध्ये जातात, पण जॉनच्या आईला ते आवडत नसे. परमेश्वर आणि धर्म या दोन्ही गोष्टी जीवनाच्या अंगभूत आहेत. फक्त रविवारी जायचे म्हणजे खरी श्रद्धा नाही. नुसते कर्तव्य केल्यासारखे, टाकणे टाकल्यासारखे जाणे आहे, असे तिचे मत होते. आपल्या मुलांना अशी सवय लागू नये म्हणून ती दक्षता घेत असे.

राजकारण हा या घराण्याचा जीवनरसच. लहानपणापासूनच ही मुले वडिलांजवळ राजकारणाबाबत चर्चा करत असत. एकदा धाकट्या ज्योने विचारले, "आपण लीग ऑफ नेशन्समध्ये का सामील झालो नाही ?"

वडिलांनी विचारले, " लीग ऑफ नेशन्समध्ये सामील झालो असतो तर तुला आवडलं असतं का ! तुझ्या या आवडीचं कारण तुला सांगता येईल का ?" आपल्या मुलांनी नुसते प्रश्न विचारू नयेत तर त्यांचा खोलवर विचार करावयाला हवा असे वडिलांना वाटे. त्या दृष्टीनेच ते मुलांना असे प्रश्न विचारत असत.

या चर्चेत घरातल्या मुलीदेखील भाग घेत. वायकांची जात म्हणून त्या मुली कधी मागे रहात नसत, आणि त्यांना कुणी मागे राहू देतही नसे.

जॉन पहिल्यापासूनच स्वतंत्र विचारसरणीचा होता, तितकाच बेडरदेखील होता. वडील बाहेर गेले की, थोरला भाऊ म्हणजे धाकटा ज्यो सगळी सत्ता आपल्या हातात घेत असे. धाकटया भावंडांचे पुढारीपण तो करायचा. त्यांच्या घराजवळ एक तलाव होता. त्यात एक छोटीशी नाव होती. ही नाव चालवावयाचे काम धाकटा ज्यो करायचा. इतर कोणालाही तो हे काम करू देत नसे. बाकी सगळी भावंडे ज्योच्या हुकमतीत रहात. पण दुसऱ्याची अशी सत्ता गाजवून घ्यायची जॉनची मात्र तयारी नसे. धाकटा ज्यो जॉनला नाव चालवू देत नसे. याचा राग येऊन एक दिवस जॉनने त्याला विचारले, " मला का नाही नाव चालवायला देत ? "

" तुला ती कशी चालवायची हे कुठं येतय् ? ते जेव्हा कळेल तेव्हा देईन. "

इतर भावंडे एवढ्यावर गप्प बसली असती. पण जॉन म्हणजे काय विचारता ? त्याने उलट आणखीन जोराने विचारले, " ते खरं, पण मग ती चालवायची कशी हे कसं कळेल मला ? "

या प्रश्नाला ज्योजवळ उत्तर नव्हते. तो एकदम चिडला आणि म्हणाला, " हे बघ, जास्त तोंड करू नकोस. खाली उतर नावेतून. "

पण जॉन गप्प बसला नाही. त्याने हट्टून म्हटले, " मुळीच उतरणार नाही येथून. मला खाली उतरवायची कोणालाही हिंमत नाही. "

धाकटा ज्यो आणखी चिडला आणि म्हणाला, " हे बघ, येथे पपा नाहीत आता. तेव्हा तुमच्या सर्वांच्यात मी मोठा आहे. माझा हुकूम पाळलाच पाहिजे. "

जॉन उसळून म्हणाला, " तुझी सत्ता मानायला मी मुळीच तयार नाही. " हे ऐकताच ज्योने त्याला पाण्यात ढकलून दिले. पण जॉन पाण्यावर आला आणि पोहत पोहत बरोबर येऊ लागला. हे बघताच ज्योचा राग कुठल्या कुठे पळून गेला. त्याने जॉनला हात देऊन नावेत घेतले आणि म्हणाला, " चल, बोट कशी चालवायची ते मी शिकवतो तुला. "

ज्यो फार लवकर रागवायचा, पण त्याचा राग चटकन् मावळायचा, तो अत्यंत प्रामाणिक होता. आपल्या कामात चुका होऊ नयेत, आपले काम निर्दोष असावे असे ज्योचे प्रयत्न चालायचे. जॉन फार खोडकर होता. ज्योच्या सत्तेविरुद्ध बंड करण्याच्या दृष्टीने तर मुद्दाम खोडकरपणाने तो ज्योला डिवचत असे. ज्योला अतिशय सावकाश खायची सवय होती, तर याच्या उलट जॉनचे.

" अरे बाबा, असा वचावचा खाऊ नको, जरा चावून घास खा. ' जॉनला सांगायची वेळ यायची. एकदा खाणे चालू असताना जॉनची थाळी रिकामी झाली. मग त्याने ज्योच्या थाळीतला मोठा क्रीमपाय् पळवला आणि तेथून तो पळून गेला. ज्यो त्याच्यामागे लागला. दोघांची तलावाच्या काठाने पाठशिवणी सुरू झाली. पळता पळता जॉन अशा ठिकाणी आला की, तेथून पुढे जायला रस्ता नव्हता. बाजूला तलाव आणि त्यात खूप खोल पाणी. ज्यो तर पाठीशी येऊन ठेपलेला. दोघांच्यातले अंतर हळूहळू कमी होत चालले. आता पाण्यात उडी टाकल्याशिवाय सुटकेचा दुसरा मार्ग नव्हता. जॉन थबकला. एकदा मागे वळून त्याने ज्योकडे पाहिले आणि उडी ठोकण्याची तो तयारी करू लागला. पण जॉनच्या चेहऱ्याकडे बघून ज्योला मात्र हसू कोसळले. पळता पळता महाराजांनी घाईघाईने अख्खा क्रीमपाय् तोंडात कोंबला आणि त्यातले सगळे क्रीम जॉनच्या चेहऱ्यावर माखले गेले होते. ते ध्यान बघून ज्योला हसावे की रागवावे हेच कळेना. तो ओरडून म्हणाला, " ए खुळ्या, चल घरी आणि आधी ते तोंड धू."

जॉनचे वडील ज्यो केनेडी अतिशय महत्त्वाकांक्षी होते. हीच महत्त्वाकांक्षा जॉनच्या रक्तात वंशपरंपरेने आली होती. जॉनच्या वडिलांनी बोस्टन शहर सोडून न्यूयॉर्कला जायचे ठरवले. त्यासाठी आधी त्यांनी आपला जम न्यूयॉर्कला बसवला आणि नंतर ते सगळे कुटुंब घेऊन न्यू-यॉर्कला आले. जॉनवर व्यवस्थितपणा, टापटीप आणि योजनाबद्धता यांचे संस्कार घरी होत असत. त्यामुळे हे गुण त्याच्या अंगवळणी पडले. न्यूयॉर्कला आल्यावर नवीन शाळा झाली. त्याचप्रमाणे मोठ्या शहरात आल्यामुळे शिक्षणाचे खर्च वाढले. जॉनला हातखर्चाला जे पैसे मिळत

त्यात त्याचे आता भागेनासे झाले. म्हणून त्याने आपल्या वडिलांना खर्चाची रक्कम वाढवून द्यायची विनंती केली. पण ती तोंडी नाही, तर एखाद्या ऑफिसात अर्ज करावा तशा भाषेत त्याने लेखी विनंतीपत्रिका लिहून दिली. आपल्याला मिळणारे पैसे, खर्चाचा हिशोब, वाढीव खर्च असे सगळे शिस्तवार त्याने त्यात मांडले होते आणि शेवटी विनंती केली होती, "म्हणून म्हणतो, कृपया माझ्या विनंतीचा योग्य तो विचार व्हावा आणि मला अधिक रक्कम मंजूर व्हावी." जॉनच्या वडिलांनी हे पत्र जपून ठेवले. एवढेच नव्हे तर यानंतर जॉनचे येणारे प्रत्येक पत्र ते जपून ठेवू लागले. जॉनचा मानसिक आणि शारीरिक विकास कसकसा होत चालला आहे याचे दर्शन त्यांना या पत्रांतून होत असे. कँटरबरीच्या शाळेतून जॉन जी पत्रे वडिलांना पाठवत असे त्यांत आपल्या अभ्यासाच्या प्रगतीसंबंधी सर्व हकीगत कळवत असे. वडिलांनी आपल्याला कुणीतरी फार मोठा करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली आहे, याची जॉनला सतत जाणीव होती. वडिलांची महत्त्वाकांक्षा पूर्ण करायला हवी, त्यासाठी अभ्यासात चांगले मार्क मिळवायला हवेत, ही तळमळ त्याच्या मनात कायम होती. इतिहासाचे ज्ञान वाढायला हवे त्याबरोबर धार्मिक गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, अशी त्याने आपल्या मनाला शिकवण दिली होती. जॉन विचारशील होता. पण सतत विचार करीत राहिल्याने तो एकांतिक किंवा माणूसघाणा बनला नाही. उलट शाळेत आणि इतरत्र त्याचे खूप मित्र होते. भरपूर अभ्यास करावा आणि नंतर भरपूर खेळावे असा या मित्रांचा कार्यक्रम असे. या पोरांच्या नित्य नव्या खेळामुळे किंवा माकड-चेष्टांमुळे कधी कधी शिक्षकांनाही नको-नकोसे होई. तसा जॉन अत्यंत मनमोकळा. लहानांइतकीच मोठ्यांशीही त्याची चटकन् मैत्री जुळत असे. अर्थात् मोठ्यांना तो नेहमी आदरानेच वागवत असे जॉनच्या बरोबरीच्या मित्रात जॉनला खूप मान मिळत असे. याचे कारण त्याची बुद्धिमत्ता. त्याला कित्येक गोष्टींची माहिती होती. एकदा टेलिव्हिजनवर 'Information Please' हा कार्यक्रम चालू होता. जॉनबरोबर त्याचा मित्र क्लिफटही हा कार्यक्रम पहात होता. पण टेलिव्हिजनवरचा माणूस काही सांगायच्या आतच जॉन पटापटा माहिती सांगत असे. नावे, तारखा, घटना, जागा

त्याला अगदी तोंडपाठ होत्या. क्लिफर्ड चकित होऊन गेला. त्याने जॉनला विचारले, " तुला इतकी बारीकसारीक माहिती कुठून मिळते रे ? "

जॉनने मोठे मार्मिक उत्तर दिले. तो म्हणाला, " मी खूप वाचतो आणि जेवढे वाचतो त्याचे नेहमी काळजीपूर्वक मनन करतो. " प्रत्येक गोष्टीचा सखोल विचार करायची जॉनला सवय होती. शिवाय आपल्या मुलांना स्वतंत्रपणे विचार करू देण्याची संधी त्यांचे वडील देत असत. जॉन आणि ज्यो यांच्यात प्रथमपासून थोडासा स्पर्धाभाव होता. आता दोघेही एकाच शाळेत शिकत होते. पण दोघांची अभ्यासात आणि इतर गोष्टींत एकमेकांच्या पुढे जाण्याची चढाओढ लागत असे. एक दिवस जॉनने अचानक वडिलांना म्हटले, " मी ही कँटरबरीची शाळा सोडून प्रिन्स्टनच्या शाळेत जावं म्हणतो आहे. " वडिलांना आश्चर्य वाटले. त्यांच्या मनात आले, ' ज्योबरोबर स्पर्धा करणे जॉनला जड जात असावे किंवा कदाचित् जॉनचे दुसरे काही मित्र शाळा बदलणार आहेत. त्यांच्या नादाने जॉन असे बोलत असावा. ' काही असले तरी त्यांना ते पसंत पडले नाही. तरी देखील ते त्याला म्हणाले, " पहा बुवा, तुझा तू विचार कर. प्रिन्स्टनची शाळा चांगली आहे हे मला माहिती आहे. तसंच तू कोणती शाळा निवडावीस याची जबाबदारीही मी तुझ्यावर टाकली आहे. माझ्या मुलाला स्वतंत्रपणे विचार करता यावा, जबाबदारीनं विचार करून स्वत: निर्णय घेण्याचं सामर्थ्य त्याला यायला हवं असं माझं मत आहे. तुला योग्य वाटत असेल तर तू प्रिन्स्टनच्या शाळेत खुशाल जा. "

हे बोलताना वडिलांना काय वाटत असेल याची जॉनला जाणीव होती. पण त्याबरोबर स्वत:बद्दल विश्वासही होता. त्याने निर्धाराने वडिलांना सांगितले, ' तुम्ही काही काळजी करू नका. मी जे करीन ते तुम्हांला अभिमानाचंच असं असेल. प्रिन्स्टनच्या शाळेत मला घातल्याबद्दल तुम्हांला पश्चात्ताप होईल असं मी कधीच होऊ देणार नाही. '

आपल्या अभ्यासाबाबत जॉन जितकी काळजी घेत असे, तितकीच इतर क्षेत्रांतल्या प्रगतीचीही काळजी घेत असे. पोहणे आणि नाव चालवणे

या दोन्ही गोष्टींत त्याने प्रावीण्य मिळवले होते. इतकंच नव्हे तर या दोन्ही कलांत त्याने आपला थोरला भाऊ ज्यो यालाही मागे टाकले होते. प्रचलित राजकारणाकडेही त्याचं बारीक लक्ष होतं. या वेळी जर्मनीत हिटलर हा एक महत्त्वाकांक्षी माणूस आपल्या देशाचे पुनरुज्जीवन करू पहात होता. जर्मनी शस्त्रसामर्थ्याने सज्ज करण्याचे त्याचे यत्न चालू होते. हिटलरची भाषणे अतिशय स्फोटक आणि विद्रोही होती. हिटलरच्या या कृत्याने सबंध जर्मनीत हिंसक तत्त्वज्ञानाची लाट पसरू लागली होती. याबद्दलचे लेख जॉनच्या वाचनांत आले. त्याने वडिलांना विचारले, " हिटलरने हे जे चालवलंय त्यामुळे व्हर्सायला केलेला तह फुकट गेला आहे. त्याचं हे कृत्य म्हणजे व्हर्सायच्या तहाविरुद्ध नाही का ? "

वडील म्हणाले, " तुझं म्हणणं बरोबर आहे. "

" मग हिटलर असा युद्धाचा प्रचार करत असताना इंग्लिश आणि फ्रेंच लोक गप्प का बसले आहेत ? "

वडिलांनी मुद्दामच चतुराईनं त्याला विचारले, " आपला देश— अमेरिका काय करते आहे ? "

" काही नाही. " तो म्हणाला.

" मग अमेरिकेनं काय करायला हवं असं वाटतं तुला ? "

जॉन गोंधळला आणि म्हणाला, " तसं नक्की सांगता येणं कठीण आहे. पण जगातल्या इतर देशांनी गप्प बसून चालणार नाही. हिटलरच्या या प्रचारामुळे सगळ्या जगात युद्धाचा वणवा पेटेल असं वाटतं. "

आई म्हणाली, " बरोबर आहे तुझं. पण त्याला अटकाव करणार कोण ? वुड्रो विल्सननी लीग ऑफ नेशन्सची जी कल्पना मांडली होती ती तशी प्रत्यक्षात आली असती तर हिटलरला सगळ्या देशांनी मिळून जाब विचारला असता. पायबंद घातला असता. "

जॉनच्या वडिलांना या विषयातून आणखी काही सुचवायचे होते. म्हणून ते सहजपणे म्हणाले, " जॉन, माणसानं आपल्या शत्रूबद्दल जास्तीत जास्त माहिती मिळवत राहिलं पाहिजे. "

जॉन गोंधळून म्हणाला, ' पण हिटलर उघडपणे आपला शत्रू कुठे ठरला आहे ? '

' बा, बाहेरच्या देशातल्या शत्रूंबद्दल मी नाही बोलत. पण आपल्या देशात, घरातल्या घरात कित्येक विरोधक असतात. त्यांच्या हालचाली शत्रुत्वाच्या असतात. त्याबद्दल मी बोलतो आहे. '

जॉनची आई त्याला समजावून देऊ लागली, " हे बघ जॉन, समज, आपल्या देशाला आणि जनतेला हितकर अशी एखादी योजना तू मांडलीस. त्या योजनेला कोणी विरोध करू लागलं तर ते का विरोध करतात, त्यांचं सामर्थ्य किती आहे इत्यादी सगळ्या गोष्टींची माहिती मिळवायला हवी. "

जॉनच्या लक्षात आले की, अमेरिकेतल्या लोकशाहीला उद्देशून ही सूचना आहे. तो म्हणाला, " खरं आहे. आपल्या देशात लोकशाहीला विरोध करणारे कित्येकजण आहेत. मी लोकशाहीचा खूप अभ्यास केला तेव्हा मला हे कळलं."

" पण तू जेवढं शाळेत शिकला आहेत ते अगदी मामुली आहे. लंडनला प्रो. लास्की या नावाचे विद्वान गृहस्थ आहेत. राजकारणाचा त्यांचा फार मोठा अभ्यास आहे. त्यांच्याकडून शिकण्यासारखं खूप आहे. देशात राहणारा प्रत्येक नागरिक जन्मजात काही हक्क घेऊन आलेला असतो. पण कित्येकदा समाजात निरनिराळे वर्ग निर्माण होतात. श्रेष्ठ-कनिष्ठ ही भावना निर्माण होते. कनिष्ठांचा छळ होऊ लागतो. त्याला कित्येकदा जन्मसिद्ध हक्कांसाठी भांडणं, लढा देणं भाग पडतं. त्यातूनच देशातल्या देशात दंगे होतात, युद्धे होतात, अत्याचार आणि हिंसा होते. "

. अमेरिकेत गोरे आणि काळे यांच्यात जो लढा चालू होता, त्याबद्दलची ही मते जॉनच्या वडिलांनी मुलासमोर मांडली. जॉनला यातून स्वातंत्र्य, समता,

बंधुभाव यांचा खरा अर्थ कळत होता. गोरे आणि काळे हा भेद माणसाने निर्माण केलेला आहे. एका रंगाच्या लोकांनी दुसऱ्या रंगाच्या लोकांना कमी लेखावे, त्यांना तिरस्काराने वागवावे हे योग्य नव्हते. मानव इथून तिथून एकाच दर्जाचा आहे, ही शिकवण त्याच्या मनावर हळूहळू बिंबत होती. त्याचे मन विशाल आणि उदार होत होते.

एकदा जॉनचे आजोबा हनी फिट्स् त्या वेळचे अमेरिकेचे अध्यक्ष प्रेसिडेंट रूझवेल्ट यांना भेटायला गेले. त्यांनी बरोबर जॉनला नेले. बाहेरच्या खोलीत बसलेले असताना जॉनच्या मनात धडधडत होतं. एवढ्या माणसा-पुढे भेटीत बोलायचं तरी कसं ? पण आजोबा हसून म्हणाले, " जॉन, अरे तू वेडा आहेस. ते जरी अमेरिकेचे अध्यक्ष असले तरी माणूसच आहेत. एवढं खरं की प्रेसिडेंट रूझवेल्ट फार थोर आहेत. "

रूझवेल्ट आणि जॉनचे आजोबा गप्पा मारू लागले. जॉन शांत-पणे त्या गप्पा ऐकत होता. त्याच्या मनात विचार चालले होते, " आणखी तीन वर्षांनी प्रत्यक्ष राजकारणाशी माझा संबंध येणार, कारण तीन वर्षांनी मला मतदानाचा अधिकार मिळेल. अमेरिकेचा अध्यक्ष कोण असावा हे मलाही ठरवण्याचा अधिकार मिळेल. "

रूझवेल्ट यांच्याबद्दल जॉनच्या मनात अतिशय आदर होता. अमेरिकेच्या या अध्यक्षाबद्दल त्याला मिळालेल्या उच्च अधिकारपदाबद्दल कौतुक वाटत होतं.

पण जॉनला कल्पनाही नव्हती. अध्यक्षपदाची ही मानाची खुर्ची त्याला प्राप्त करून द्यायचे धागे विणायला नियतीने केव्हाच सुरुवात केली होती.

जॉनचे शालेय शिक्षण संपले. तो कॉलेजात गेला. कॉलेजमध्ये गेल्यावरही तो अभ्यासात आणि खेळात सारख्याच उत्साहाने भाग घेत असे. कॉलेज म्हणजे निव्वळ खेळाचे मैदान नव्हे, असे तो मानत असे. इतिहास, साहित्य, राज्यशासन, कला, गणित, विज्ञान इत्यादींचा अभ्यास करणे हे

कॉलेज-शिक्षणाचे खरे ध्येय. जॉनला या गोष्टींची पूर्ण जाणीव होती. तो अति हुषार असा विद्यार्थी कधीच नव्हता. हारवर्ड कॉलेजात असताना त्याचा प्रत्यक्ष राजकारणाशी काही संबंध नव्हता. त्याने कोणत्याही राजकीय चळवळीतदेखील भाग घेतला नाही. पण राजकारणाची त्याला उपजत आवड होती.

या वेळी सबंध जगाच्या राजकारणात प्रचंड उलथापालथ चालली होती. हिटलरचा विस्तारवाद अधिक उग्र होऊ लागला होता. स्पेनमध्ये अंतर्गत युद्धाने दुफळी माजली होती. इक्लासा जपानही आपली शस्त्रं परजीत उभा होता. सगळ्या जगावर युद्धाचे ढग जमू लागले होते. जॉनने विचार केला, ' जे घडतयं त्याची आपल्याला पूर्ण माहिती करून घ्यायला हवी. प्रत्यक्ष युद्ध सुरू झालं की, मग कुठेही फिरणं कठीण होईल. तेव्हा त्यापूर्वी सर्व युरोपची परिस्थिती डोळ्याखालून घालावी. जॉन केनेडी आणि त्याचा एक मित्र लेस बिलिंग्ज हे युरोपच्या दौऱ्यावर निघाले.

फ्रान्सच्या सीमेवर ' मॅजिनो लाईन ' या नावाची एक काल्पनिक रेषा आखली होती. या सबंध रेषेवर सुरुंग पेरण्यात आले होते. त्यामुळे फ्रान्स देश स्वत:च्या रक्षणाबद्दल निर्धास्त होता. इतकंच नव्हे तर तो देश आत्म-प्रौढीनं सांगत होता, ' ही आमची लक्ष्मण-रेषा आहे. नाझी रावण या रेषेच्या आत एक पाऊलही टाकू शकणार नाही.' प्रत्येक देश आपापल्या परीनं युद्धाच्या तयारीत होता.

जॉन आणि लेस बिलिंग्ज संपूर्ण फ्रान्स, इटली, स्पेन इत्यादी देशांचा दौरा पूर्ण करून १९३७ मध्ये परत आले. या प्रवासाचा परिणाम म्हणूनच जॉन अधिक अंतर्मुख, अधिक गंभीर आणि अधिक विचारी बनला होता. युरोपमध्ये केव्हातरी युद्धाचे अग्निकुंड धडाडणार. ते आता टाळणे कोणाच्याही हातात नाही आणि त्याचबरोबर अमेरिकेलाही या युद्धापासून दूर रहाणं अशक्य आहे, अशी त्याची खात्री झाली होती.

◆ ◆ ◆

# २

## यशोमंदिराच्या पायरीवर

जॉन आता प्रबंध लिहिण्याच्या कामात व्यग्र होता. आपला हा प्रबंध पुरा करण्याचा त्याने चंग बांधला. त्यासाठी बर्ट्रांड रसेल यांचे मार्गदर्शन घ्यायचे त्याने ठरवले. कारण रसेल हे लोकशाहीवादी असल्यामुळे जॉनला त्यांच्या विचारांचा आणि अनुभवांचा फायदा मिळाला असता. या मार्गदर्शनाप्रमाणेच त्याला आणखी एक उत्तम संधी मिळाली. परराष्ट्रीय कचेऱ्यांत कामकाज कसे चालते याचा जॉनला अनुभव यावा, माहिती मिळावी यासाठी त्याच्या वडिलांनी त्याला लंडनमधल्या अमेरिकेच्या वकिलातीत पाठवून दिले. या निमित्ताने त्याला पोलंड देशाला भेट देता आली. लाटव्हिया, बाल्टिक प्रदेश, रशिया, पॅलेस्टाइन, इटली, जर्मनी या देशांतूनही तो फिरून आला. जिथे जिथे तो गेला त्या देशातली परिस्थिती तो नीट अभ्यासत असे. तिथल्या राजकारणाचे तो काळजीपूर्वक निरीक्षण करी. या निरीक्षणातून त्या परिस्थितीचा पूर्ण विचार करून तो राजकीय प्रश्नांबद्दल आपली मते बनवी. त्याचे तर्क अचूक असत. विचार सखोल असत. त्यामुळे त्याने मांडलेले मत अगदी बिनचूक ठरत असे. हिटलर पोलंडमधील डॅन्झीग शहर ताब्यात आणण्याचा विचार करीत होता. पण या शहरातले लोक जिवात जीव असेतो शहराचे रक्षण करतील, हिटलरला या शहरावर सुखासुखी ताबा मिळविता येणार नाही, हे त्याने अगोदरच ओळखले होते. त्याबरोबरच त्याला हेही दिसून आले होते की, जर्मन लोकांना इंग्लिश लोकांबद्दल अतोनात द्वेष वाटतो. ब्रिटिशांची राजनीती

त्याला पटली. पण ती राजनीती अपूर्ण आहे असे त्याला वाटत होते. हिटलर शांतपणे मुळीच बसणार नाही. ब्रिटनने हिटलरला कितीही शांत ठेवण्याचा प्रयत्न केला तरी तो ऐकणार नाही. उलट केव्हातरी संपूर्ण युरोप तो पेटवून देईल अशी जॉनला खात्री वाटत होती. त्याची खात्री बरोबर ठरली. जर्मनीने पूर्वी केलेला तह धुडकावून लावला. हिटलरने सर्व सत्ता ताब्यात घेतली आणि त्याच्या आज्ञेखाली जर्मनीचे स्वस्तिक चिन्हांकित टँक आणि विमाने जर्मनीतून निघाली. १९३९ साली पोलिश-जर्मन आघाडीवर टँक आणि विमाने घरघरू लागली. पहाता पहाता युद्धाच्या ज्वाला भडकल्या. चंगीजखानाच्या सैन्यासारखे जर्मनीचे सशस्त्र सैनिक पोलंड देशात धुमाकूळ माजवू लागले. कोणतीही पूर्वसूचना न देता सर्व पोलिश लोकांची धरपकड आणि अमानुष कत्तली सुरू झाल्या. पोलंडचे रक्षण करण्याची हमी ब्रिटन आणि फ्रान्स या देशांनी व्हर्सायच्या तहान्वये घेतली होती. तेव्हा आता दिल्या शब्दाचे पालन करण्याची त्यांच्यावर जबाबदारी आली. या दोन्ही देशांनी १९३९ मध्ये युद्धात उडी घेतली; पण अमेरिका अद्याप तटस्थ होती. जॉन विचार करीत होता. त्याने वडिलांना विचारले, " आपला देश आता काय करणार ? युद्ध की तटस्थ रहाणार ? " पण त्याच्या या प्रश्नाचं उत्तर लौकरच भवितव्यतेने दिले.

युद्धात निर्वासित झालेले कित्येक नागरिक ब्रिटिशांच्या ' अथेन ' या जहाजातून परत मायदेशी येत होते. हे निर्वासित कॅनडाला येत होते. बहुसंख्य अमेरिकन लोक होते. अटलांटिक महासागरातून प्रवास करताना त्यांना नाझींच्या एका " यू " बोटीने पाहिले. कोणताही विचार न करता यू बोटीने ' अथेन ' जहाजाच्या तळाला सुरुंग लावला. जहाजावर एकच आकांत उडाला. जॉनच्या वडिलांना फोनने ही बातमी कळवली. ते चिडले आणि त्यांनी म्हटले, " याचा अर्थ काय ? अमेरिका युद्धात पडली नाही तरीही तटस्थ अमेरिकेच्या नागरिकांवर नाझींनी हल्ला केला. आम्हांला याचा बदला घ्यायलाच हवा. " या हल्ल्यामुळे कित्येक लोक ठार झाले. कित्येक जखमी झाले. त्यांची व्यवस्था पहाण्यासाठी जॉनला पाठवले गेले. ग्लासगो शहरात सगळीकडे शोक, संताप आणि दुःख यांनी वातावरण

तंग झाले. जॉनने आपले काम अतिशय व्यवस्थित केले. आपल्या कामाचा अहवाल दिल्यानंतर त्याने वडिलांना म्हटले, " आता तरी अमेरिका युद्धात भाग घ्यायला तयार आहे की नाही ? " वडिलांना त्याच्या स्वरातली चीड कळली. पण ते शांतपणे म्हणाले, " नाही, अद्याप वेळ आहे. "

जॉनने म्हटले, " तशी इंग्लंडचीही तयारी नाही. परंतु दुसऱ्या कुणी हल्ला केला तर ते प्रतिकार नक्की करतील. तसंच फ्रान्स आणि पोलंडचंही आहे. ते प्रतिकार करतील, पण स्वत: होऊन जर्मनीवर हल्ला करण्याची मात्र कुणाचीच ताकद नाही. "

' अथेन ' जहाजावर झालेल्या त्या हल्ल्याच्या प्रसंगात जॉनचे नाव लोकांच्या डोळ्यांसमोर येऊ लागले. त्याने केलेल्या कामगिरीमुळे त्याला प्रसिद्धी मिळू लागली. वृत्तपत्रांतून त्याचे फोटो आणि वर्णने येऊ लागली. बोस्टन ग्लोब या वृत्तपत्राने जॉनचे वर्णन अशा शब्दात केले, " परराष्ट्रीय वकिलाचा हा तरुण मुलगा देखणा, उंच आणि सडपातळ आहे. त्याला खुर्चीच्या हातावर पाय टाकून बसायची सवय आहे. "

जॉन केनेडीचा स्वभाव विचार करण्याचा होता. कोणत्याही गोष्टीचा मुळाशी जाऊन विचार करावयाची त्याला सवय लागली होती. त्यामुळे हिटलरच्या तत्त्वज्ञानाचाही त्याला विचार करावासा वाटत होता. सबंध जगात युद्धाचा वणवा पेटवणारा हा माणूस कोणत्या हेतूने जगाचा नाश करणार आहे ? त्यामागे केवळ जग जिंकण्याची त्याची हाव आहे की, त्याला काही इतिहासाचा आधार आहे ? इत्यादी गोष्टींचा अभ्यास त्याने सुरू केला. एव्हाना नाझी सैन्याने पोलंडला पार धुऊन काढले होते. डेन्मार्क, हॉलंड आणि नॉर्वे या देशांतून नाझींची विमाने आणि टँक्स निर्धास्तपणे हिंडू लागली होती. मॅजिनो रेषेबद्दलचा फ्रान्सचा गर्व पार धुळीला मिळाला होता. म्युनिचमधल्या करारामुळे युद्धाची बीजे तिथे पेरली होती असे सर्वांना वाटत होते. म्युनिचमध्ये बॉल्डवीन आणि चेंबरलेन यांनी फ्यूररच्या—हिटलरच्या हातात सत्ता सोपवली त्यामुळे फ्यूररला संधी मिळाली आणि एकही गोळी न झाडता झेकोस्लोव्हाकिया देश त्याने

गिळंकृत केला. सगळे जग बॉल्डविनवर विशेषत: चेंबरलेनवर आग पाखडू लागले. जॉन आपल्या प्रोफेसराकडून माहिती घेत होता. त्याने विचारले, ' सर, केवळ एक माणूस किंवा काही मूठभर माणसं महत्त्वाकांक्षेनं प्रेरित झाली. त्यांच्या मनात पिसाट विकृत असे विचार आले म्हणून हे युद्ध निर्माण झाले आहे का ? '

ते म्हणाले, " नाही. नाझीवादामागे एकांगी विचारप्रणाली आहे. एक नवीन प्रकारची ही विचारधारा आहे. "

जॉनच्या मनात कल्पना चमकली. आपण आपल्या प्रबंधासाठी हाच विषय निवडावा असे त्याने ठरवले आणि नाझी या पक्षाविषयी तो माहिती गोळा करू लागला. नाझी पक्ष, त्याच्या मागची तत्त्वप्रणाली, त्याचा जन्म, विकास, त्याचे आताचे स्वरूप याबद्दल मिळेल ती माहिती तो गोळा करीत होता. त्याचा हा प्रबंधाचा विषय अगदी नवीन आणि अतिशय महत्त्वपूर्ण होता. त्याला कामही खूप करावं लागत होते. त्यामुळे हा प्रबंध लिहीत असताना कॉलेजात क्लबच्या पार्ट्या, नृत्य इत्यादी मनोरंजनाच्या साधनांना त्याने फाटा दिला. त्याच्या मित्रांच्या आग्रहालाही त्याने दाद दिली नाही. प्रबंध सर्वांना खूप आवडला. लवकरच तो प्रबंध पुस्तकरूपाने प्रकाशितही झाला. त्याने या पुस्तकाला नाव दिले—Why English Slept ? ( इंग्लंड का झोपले ? ) या पुस्तकावर अनेक वृत्तपत्रांनी अभिप्राय व्यक्त केले.

एकाने लिहिले होते, ' हिंसा विरुद्ध शांती. '

दुसऱ्याने लिहिले होते, ' अमेरिका युद्धात उतरायला विलंब का लावत आहे. याचे समर्थन केनेडीच्या तरुण मुलाने चांगले केले आहे. '

तिसऱ्या वृत्तपत्रात होते, ' इंग्लंडच्या अनुभवावरून अमेरिका शहाणी असे या पुस्तकावरून आढळते. '

' ज्वलंत प्रश्नावर धडाडीने आणि खूप परिश्रम करून लिहिलेले वास्तववादी पुस्तक ' असाही एक अभिप्राय होता. आणखी एका वृत्तपत्राने

लिहिले होते, 'अमेरिका ब्रिटनसारखी सुस्त राहणार नाही, अशी केनेडीला आशा वाटते आहे.'

'आपल्या देशाच्या राजनीतीचे केनेडीने चांगले समर्थन केले आहे. अमेरिकेची प्रशंसाही यात आहे. त्याचबरोबर चालू सामाजिक विचारप्रवाहांबद्दलही केनेडी जागरूक असल्याचं आढळतं.'

आणखी एकाने शेरा मारला होता, 'या पुस्तकाचा लेखक तरुण आहे. पण तो अननुभवी असेल असे मात्र या पुस्तकावरून वाटत नाही.'

एकंदरीत या पुस्तकाने जॉनला उत्तम लेखक म्हणून मान्यता मिळवून दिली.

अमेरिका युद्धात उतरली नव्हती. पण अन्तर्गत संरक्षणाची मात्र हळूहळू सिद्धता चालू होती. अमेरिकेत संरक्षक दले स्थापन झाली होती. अशा दलात भरती व्हायचे जॉनने ठरवले.

परंतु हारवर्ड विद्यापीठात असतानाच त्याला पाठदुखीची व्यथा जडली होती. शारीरिक तपासणीत त्याच्या पाठीत दोष आढळला. त्याला भरती करून घेतले नाही. जॉन चिडला आणि वडिलांना म्हणाला, "एकीकडे भरती व्हा असं आवाहन करतात आणि दुसरीकडे मी उत्साहानं भरती होणार तर माझा हिरमोड करतात."

वडिलांनी त्याची समजूत घातली, "अरे, चिडायचं कशाला? आपल्या संरक्षक-दलात निरोगी आणि सशक्त माणसं असावीत यासाठीच काळजी घेतली जात आहे."

जॉनची समजूत पटली. पण त्याला खंत वाटली. आपल्या अंगातला हा दोष काढून टाकण्यासाठी त्याने विवक्षित पद्धतीचा व्यायाम घ्यायला सुरुवात केली.

संरक्षक दलामध्ये जमले नाही तरी नेव्हीमध्ये त्याला फारशा हरकती न घेता त्याला भरती करण्यात आले. परंतु लेखक म्हणूनच त्याची

आतापर्यंत प्रसिद्धी झाली होती. त्यामुळे त्याला इथे लिखाणाचे काम अधिक देण्यात आले. त्याला हे आवडत नव्हते. प्रत्यक्ष युद्धात भाग घ्यावा अशी त्याला तीव्र इच्छा होती. एक दिवस त्याचे हेही ईप्सित पुरे झाले. एकदा लेफ्टनंट केनेडी आणि त्याचा मित्र पॉल फे हे एका छोटया बोटीतून पॅसिफिक महासागरातून चालले होते. त्यांची जपानच्या पी. टी. १०९ या जातीच्या बोटीशी गाठ पडली. जपानी बोटीने केनेडीच्या जहाजावर हल्ला चढवला. जहाजातले सगळे लोक बाहेर पाण्यात फेकले गेले. रात्रीचा दाट अंधार आणि पॅसिफिक महासागराचे खोल पाणी. आपण कोणत्या दिशेने जात आहोत याचाही पत्ता लागणे कठिण. परंतु बेडरपणानं महासागराच्या लाटांशी दोन हातांनी प्रत्येकजण झुंज घेऊ लागला. अखेर ते एका छोटया बेटाच्या किनाऱ्याला लागले. या बेटाचे नाव होते ओलासाना. या बेटाच्या जवळच नॉरा नावाचे बेट होते एकदा आपण कुठे आहोत हे कळल्यावर पुन्हा सर्वजण पोहत निघाले आणि नॉरा बेटावर आले. जमिनीला पाय लागले खरे, पण खाण्यापिण्याचा प्रश्न आ वासून उभा होता. सुदैवाने तोही थोडयाच वेळात सुटला. युद्धाच्या धाऊगर्दीत कुणीतरी कँडीची पेटी तेथे टाकून दिली होती. शिवाय बेटावर खूप नारळही होते. एव्हाना ते बेपत्ता झाल्याची बातमी सर्वत्र पसरली होती. नॉरा बेटावर रहाणाऱ्या काही रहिवाश्यांकडून ऑस्ट्रेलियन लोकांना या मंडळींची माहिती मिळाली आणि लौकरच त्यांची सुटका करण्यात आली. जॉनच्या आयुष्यातला हा अत्यंत रोमहर्षक प्रसंग होता. परंतु जिवावरच्या या संकटातही तो डगमगला नाही. स्वतःच्या जिवाची पर्वा न करता, कष्टाची तमा न बाळगता त्याने आपल्या सहकाऱ्यांना वाचवले. स्वतः त्यांना आधार देऊन पोहत बेटावर नेले. ही अमाप मदत करताना तो थकला नाही, निरुत्साही झाला नाही. त्याच्यातले शौर्य, धैर्य, जिवावरच्या प्रसंगांना तोंड देणे, सहकाऱ्यांना संभाळून नेणे इत्यादी गुणांची कसोटीच लागली.

जॉनचा मोठा भाऊ ज्यो सैन्यात भरती झाला होता. जॉनची एक बहीण कॅथी हिने विल्यम कॅव्हेंडीश याच्याशी लग्न केले होते. दुसऱ्या महायुद्धात दोघेही मारले गेले. केनेडी कुटुंबावर हा मोठा आघात झाला

होता. दुःखाचा हा उमाळा थंड कसा करायचा यासाठी जॉनने एक काम हाती घेतले. आपल्या भावाची–ज्योची सर्व कौटुंबिक पत्रे त्याने एकत्र केली. त्या पत्रांचे एक सुंदर पुस्तक बनवले. त्याला नाव दिले, "आमच्या स्मृतीत असलेला ज्यो."

पुस्तकाचे काम चालू असतानाच जॉनच्या पाठीच्या दुखण्याने पुन्हा उचल खाल्ली. या वेळी त्याला ऑपरेशन करून घेणे भाग होते. ऑपरेशन नाजूक तसे जोखमीचे होते. त्याला बरेच दिवस विश्रांती घ्यायला लागली; पण या विश्रांतीच्या काळात जॉन बिलकुल स्वस्थ बसला नाही. शांतपणे आणि स्वस्थपणे मिळालेल्या विश्रांतीचा उपयोग त्याने विचार करण्यात केला आणि याच काळात त्याने आपल्या पुढच्या आयुष्याची दिशा ठरवली.

दुसऱ्या जागतिक महायुद्धाने सगळे देश मनुष्यहानी, हिंसा, अत्याचार याला कंटाळले. युद्धाने जागतिक प्रश्न सुटणार नाहीत, जागतिक शांततेची त्याला आवश्यकता आहे हे सर्व देशांना उमगले. या विचारमंथनातून नवीन नवीन विचारप्रणाली जन्माला येत होत्या. प्रत्येक देशात काही ना काही प्रमाणात बदल घडू लागले होते. जगाच्या नकाशावर रशिया विरुद्ध अमेरिका व ब्रिटन असे दोन तट उघड उघड दिसू लागले होते. अमेरिकेला शांतता मिळवायची असेल तर आपले राजकीय धोरण ठाम पाहिजे. देशाचे सामर्थ्य आणि जनतेचा आत्मविश्वास वाढायला हवा. जॉन केनेडी एका काळी युद्धात भाग घ्यायला उत्सुक होता. पण आता शांततेसाठी तितकाच तो धडपडू लागला. आता राजकारणात सक्रीय भाग घ्यायला हवा असे त्याने ठरवले. त्याला संधीही चालून आली. बोस्टनमधून जिम कर्ले संसदेत निवडून गेला होता. त्याला संसदेच्या धकाधकीचा कंटाळा आला. या रहाटगाडग्यापेक्षा आपल्या गावचे मेयरपद बरे असे ठरवून जिमने आपल्या जागेचा राजिनामा दिला. त्या रिकाम्या जागेसाठी जॉनने 'उभा रहाणार' असे जाहीर केले. त्याच्या वडिलांनी आश्चर्याने म्हटले, " तू हे विचार करून ठरवले आहेस ना ? "

" होय, पूर्ण विचार केला आहे. मला पाहिजे आहे तीच गोष्ट आहे ही ! "

अमेरिकेतला अकरावा जिल्हा हा दरिद्री जिल्हा समजला जात असे. आयरिश, इटालियन, चिनी असे निरनिराळ्या देशांतले लोक इथे एकत्र रहात होते. निवडणूक लढवण्याच्या दृष्टीने हा जिल्हा काही फारसा चांगला नव्हता. पण जॉनने मात्र याच जिल्ह्यातून निवडणूक लढवायचे ठरवले. त्याच्या या निश्चयापासून परावृत्त करण्याचा त्याच्या काही मित्रांनी प्रयत्न केला. पण त्याचा निश्चय कायम होता. तो म्हणाला, " पन्नास वर्षांपूर्वी माझ्या आजोबांनी याच भागातून निवडणूक लढवली. मी तेच करणार आहे. " ' यांकी रेडिओ नेटवर्क 'वर मी जे भाषण करीन ते ऐका आणि मला तुमचं मत कळवा."

या जिल्ह्यातून उभे रहाणाऱ्या माणसाने इथल्या लोकांना कळेल, त्यांचे हृदय ओढून येईल अशी भाषा बोलायला हवी, हे जॉनच्या लक्षात आले. निवडणुकीला उभा राहिलेला उमेदवार या नात्याने त्याने जे भाषण केले त्यात तो म्हणाला, " आमची जहाजं बुडत होती. आमचे कोवळे तरुण युद्धात मारले जात होते. त्या वेळी मी मनाशी प्रतिज्ञा केली की, युद्धाइतकीच शांततेसाठी मी माझ्या देशाची सेवा करीन. "

या भाषणानंतर जॉन केनेडीचा तुफानी प्रचार सुरू झाला. कामगारांची हॉटेले, दुकाने, केशकर्तनालये इत्यादी ठिकाणी जाऊन तो स्वतः सांगत असे, " मी जॉन केनेडी. आपल्या भागातून जिम कर्लेची रिकामी जागा लढवतो आहे. "

अवघ्या एकोणतीस वर्षांच्या या तरुणाकडे पाहून कुणी म्हणत, " बच्चा आहे अजून हा. " कुणी बड्या बापाचा बेटा म्हणून नाकही मुरडल. पण असले ऐकूनही जॉनची उमेद खचली नाही. त्याचा झंझावाती प्रचार अविरत चालू होता. स्थानिक लोकांच्या गरजा, त्यांच्या आशा-आकांक्षा, नोकऱ्यांची जरूरी, वाढते रहाणीमान, घरांची आवश्यकता, सामाजिक सुरक्षितता, आरोग्यविषयक मदत इत्यादी विषयांची माहिती

करून घेऊन तो त्यावर तळमळीने बोलत असे. खालच्या श्रेणीतल्या या लोकांबरोबर तो प्रेमाने हस्तांदोलन करी. इटालियन लोकांबरोबर त्यांची स्पॅघेटी खात असे. चिनी लोकांबरोबर जेवताना त्यांच्यासारखा काडयांचा उपयोग करीत असे. बोलतानाही त्या लोकांच्या बोलीभाषेतच बोलत असे. त्याच्या या मिळूनमिसळून वागण्यामुळे जॉन आणि त्याचा मतदार संघ यांच्यात आपलेपणा निर्माण झाला. विश्वास निर्माण झाला. जनतेवर जॉनच्या या वागण्याचा निश्चित परिणाम झाला आणि जॉन निवडून आला. त्याच्या यशोमंदिराची ही पहिली पायरी होती.

१९५१ सालच्या वसंतऋतूत जॉनच्या आयुष्यातली आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडली. वॉशिंग्टन येथे एक छोटीशी अनौपचारिक पार्टी झाली. या मेजवानीचे यजमान होते मार्था आणि चार्लस बॅर्लेट. या मेजवानीला जॉन हजर होता. शिवाय या मेजवानीत आणखी एक सुंदर पाहुणी सामील झाली होती. हिचे नाव जॅकेलिन बोव्हीयर. जॅकेलिन आणि मार्था या मैत्रिणी होत्या. इतक्या पाहुण्यांमध्ये जॅकेलिनचे लक्ष जॉनच्या व्यक्तिमत्त्वाने ओढून घेतले. ती मार्थाला म्हणाली, " कोण आहे ग हा ? कुठंतरी पाहिल्यासारखा वाटतोय."

" तो ना ? तो जॉन केनेडी. बऱ्याच वेळा पाहिला असशील. गेली चार वर्षे वॉशिंग्टनमध्ये राहतो आहे. असेंब्लीचा सभासद आहे. फार देखणा आहे नाही ग ? "

जॅकेलीन मिष्किलपणे हसत म्हणाली, " तुला काय वाटतं की मी आता राजकारणात लक्ष घालायला सुरुवात करावी ? "

तिचा रोख ओळखून मार्था म्हणाली, " तुला काही अशक्य नाही ते. "

आणि हळूच तिने खोडकरपणे जॅकेलीनला सुचवले, " बघ बाई, विचार करण्याच्या योग्यतेचा पुरुष आहे हा. "

आणि खरोखरच तो तसा होता. प्रथमदर्शनीच जॅकेलीनचे त्याच्याविषयी अतिशय चांगले मत झाले होते. योगायोगाची गोष्ट अशी की, जॉन केनेडीही जॅकेलीनच्या सौंदर्याने मोहित झाला होता. त्यांच्या भेटीगाठी होऊ लागल्या. एक दिवस जॅकेलीन मार्थाला हसत हसत म्हणाली, " खरंच, हा लोकविलक्षण पुरुष आहे. त्याच्याकडून राजकारणाचे धडे घ्यायला हरकत नाही. "

मार्थाच्या लक्षात आले, जॅकेलीन आणि जॉन यांचे एकमेकांवर प्रेम बसले आहे.

जॅकेलीनचे आई-वडील अतिशय देखणे होते. त्या सौंदर्याचा वारसा जॅकेलीनला मिळाला होता. याबरोबरच ती सुविद्य आणि सुसंस्कृतही होती. घोड्यावर बसवण्यात ती पटाईत होती. फ्रेंच, इटालियन आणि स्पॅनिश या तिन्ही भाषांवर तिचे प्रभुत्व होते. साहित्य आणि कलाकौशल्याचा तिने अभ्यास केला होता. अठराव्या वर्षी ' लावण्यवती ' म्हणून तिची देशात निवड झाली होती. ती आणि जॉन एकमेकांच्या सहवासात आले आणि जॉनमुळे तिला राजकारणाची माहिती होऊ लागली. त्याचबरोबर तिच्यामुळे जॉनला साहित्य आणि कलाकौशल्य यांच्यात गोडी वाटू लागली. अगदी थोड्या दिवसांच्या या परिचयात एकमेकांबद्दल त्यांना ओढ वाटू लागली. जॉनने बोलता बोलता तिला सीनेटसाठी उभे राहण्याची आपली महत्त्वाकांक्षा बोलून दाखविली. यावर ती कौतुकाने म्हणाली, " तुझ्या आकर्षक व्यक्तिमत्वाने आणि देखणेपणाने सीनेटमध्ये शोभा येईल. पण खरं सांगायचं तर तू वयानं लहान आहेस. "

जॉन गंभीरपणे म्हणाला, " मला खात्री आहे की ही जागा मी नक्की जिंकू शकेन. "

जॅकी मृदू स्वरात म्हणाली, "ज्या ज्या गोष्टीवर तुझं मन जाईल ती ती गोष्ट तू नक्की जिंकू शकशील. "

जॉनने तिच्याकडे चटकन् पाहिले. गंभीरपणा वितळू लागला होता.

त्याच्या मनात आनंद उफाळून आला. किंचित् गोंधळत त्याने विचारले, " मी....मी सीनेटमध्ये निवडून आलो तर....? "

ती खळखळून हसत खोडकरपणे म्हणाली, " तर काय ! तुला सीनेटर म्हणून हाक मारायला बरं वाटेल मला. '

त्याला वाटले, " आपल्या प्रश्नाचं उत्तर मिळाल्यासारखं आहे. पण आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी हिच्यापासून काही दिवस दूर जायला लागणार आहे. त्याचे काय ? " तो थोड्या विषण्ण स्वरात म्हणाला, " मी सिनेटर झालो तर तुला आवडेल ते, हे खरं पण त्यासाठी मला फार मोठा लढा द्यायला लागणार आहे. परिश्रम करायला लागतील. दिवसेंदिवस तुला भेटायला मिळणार नाही. "

तिला वाईट वाटले. चेहऱ्यावर उदासीनता पसरली. पण थोड्याच वेळात शांत आणि गंभीर स्वरात ती म्हणाली, ' चालेल. मी वाट पाहीन. पण काही झालं तरी तू निवडून यायला हवास. मला फार आनंद होईल त्याचा. "

जॉन निघून गेला. तो आपल्या पुढच्या योजनेला लागला. जॅके-लीनला मात्र दिवस कंटाळवाणे वाटू लागले.

जॉन आपल्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी काय काय करतो आहे हे ती पाहात होती आणि आशेने त्याची वाट पाहात होती.

◆ ◆ ◆

# ३

## प्रगतीची पाऊलवाट

जॉनचा प्रतिस्पर्धी होता हेन्री कॅबट लॉज. अतिशय प्रसिद्ध, मुरब्बी आणि समर्थ व्यक्तित्वाचा हा पुरुष होता. याच्याशी निवडणुकीत लढत देणे सोपे काम नव्हते. पण जॉनचा निर्धार, त्याने केलेले कष्ट आणि तुफानी प्रचार याचे फळ त्याच्या पदरात पडले. हेन्री कॅबट लॉजचा पराभव करून जॉन सीनेटवर निवडून आला. जॉनची ही महत्त्वाकांक्षा पुरी झाली होती. आता दुसरी इच्छा पुरी करून घ्यायच्या मागे तो लागला. त्याच्या दृष्टीने ही देखील अतिशय महत्त्वाची गोष्ट होती. जॅकेलीनची गाठ घेऊन तो पुन्हा तिच्या सहवासात दिवस घालवू लागला. सहली, मेजवान्या, थिएटर्स इत्यादी भरगच्च कार्यक्रमांत दिवस भराभरा जाऊ लागले. लौकरच त्याने जॅकेलीनला मागणी घातली.

१९५३ च्या जूनमध्ये वाङ्‌निश्चयाची पार्टी द्यायची ठरली. या पार्टीला अगदी मोजके लोक बोलवायचे असे जॉनने ठरवले होते. म्हणून त्याने आपल्या सेक्रेटरीला, मिसेस लिंकनला बोलावून सांगितले, "मी सांगते ती यादी उतरून घ्या."

त्याने यादी सांगितली आणि 'एवढी पुरे' असे म्हणून तो निघून गेला पण पुन्हा थोड्या वेळाने परत येऊन म्हणाला, "मिसेस लिंकन, ही आणखी काही नावे घालायचीत मघाच्या यादीत." आणि तेवढी नावे

सांगून तो गेला. पण सारा दिवसभर असेच चालले होते. आणि अगदी नाही म्हणता म्हणता त्या ' मोजक्या ' मित्रांची यादी चांगलीच लांबरुंद झाली. सप्टेंबर महिन्यात जॉन आणि जॅकेलीनचा विवाह झाला.

पण जॉनने निवडणुकीत घेतलेल्या परिश्रमामुळे त्याच्या पाठीच्या दुखण्याने उचल खाल्ली. या वेळीही त्याला हॉस्पिटलमध्ये पडून रहावे लागले. पण त्याला स्वस्थ बसणे कधी माहीतच नव्हते. या काळात भरमसाट पुस्तके वाचण्याचा त्याचा उद्योग सुरू झाला. जॅकेलीनला रोज त्याच्यासाठी पुस्तकांचा गठ्ठा घेऊन यावा लागे. पुस्तके आणल्यावर ती विचारी, " कुठे ठेवू ही ? "

" माझा हात पोचेल अशा ठिकाणी ठेव ती सगळी."

" मुळीच नाही. तुम्हांला मी पुस्तकं काढून देईन. " जॅकेलीन त्याला दटावत असे. जॅकेलीनला जॉनबद्दल विलक्षण आदर होता. जगातला अत्यंत धैर्यवान् पुरुष एकमेव जॉनच आहे अशी तिची खात्री झाली होती. त्यामुळे ती त्याला सारखी जपत होती. त्याला विश्रांती घ्यायला डॉक्टरांनी सांगितले आहे, अशी सारखी आठवण तिला करून द्यावी लागे. अर्थात् जॉन ते मानत नसे ही गोष्ट वेगळी. या आजारपणात एकदा त्याला खेड्यात राहणाऱ्या एका ८० वर्षांच्या वृद्ध स्त्रीचे पत्र आले. तिने लिहिले होते, " तू बिछान्याला खिळून पडला आहेस. पण तुझ्यापेक्षा जास्त दिवस मी बिछान्यावर खिळून आहे. मी आता फार थोड्या दिवसांची सोबतीण आहे. आतापर्यंत एकाही डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवाराला मी मत दिलं नाही. पण मरण्यापूर्वी तुला मत द्यावं अशी माझी इच्छा आहे. तेव्हा लवकर बरा हो आणि कामाला लाग. "

जॉन जॅकीला चिडवून म्हणाला, " बघितलंस, ८० वर्षांची ही वृद्ध स्त्री मला कामाला लाग म्हणते आणि तू मात्र नुसते आळशासारखे पडून राहायला सांगते आहेस. "

जॅकी हसून म्हणाली, " तुमच्या चळवळ्या केनेडी घराण्यातलीच ही बाई असावी बहुतेक. "

जॉनला स्वस्थ बसणे कधीच मानवले नाही. सतत चळवळ करणे, कार्यमग्न राहणे आणि अस्वस्थपणा हे स्वभावविशेष त्याच्या रक्तात मुरलेले होते. त्याचे सबंध जीवन खूप जोराने उसळणाऱ्या हजारी कारंजांसारखे होते. त्याच्या या गुणविशेषांचा प्रत्यय घरात जॅकेलीनला येत असे आणि ऑफिसात मिसेस लिंकन या त्याच्या सेक्रेटरीला येत असे. त्या प्रथम त्याच्या ऑफिसात कारकुनाचे काम करीत होत्या. त्यांचे पति हॅरोल्ड लिंकन हेही तेथेच काम करीत. मिसेस लिंकनना नेहमी वाटायचे, अमेरिकेच्या अध्यक्षाच्या सेक्रेटरीपदाची जागा आपल्याला मिळावी. दोघे नवराबायको अमेरिकेचा आगामी अध्यक्ष कोण होऊ शकेल याचे अंदाज बांधत असत. गंमत अशी की त्यांच्या डोळ्यांसमोर नेहमी जॉनचेच नाव येत असे. मग त्यांनी ठरवले, जॉन केनेडीचे सेक्रेटरीपद मिळवायचेच. त्यासाठी मिसेस लिंकनने जॉनचे एक सहकारी टेड रिअर्डन यांच्याबरोबर विनावेतनही काम केले. कामात त्या अतिशय चोख होत्या. प्रथम जॉनच्या ऑफिसात काम करीत असताना दोन-तीन आठवडे जॉनची आणि त्यांची गाठही पडली नाही. पण एकदा त्या रात्री एकट्या काम करीत बसल्या होत्या. त्या वेळी जॉनच्या ऑफिसात दिवा होता. ऑफिसात तो असेल अशी त्यांना कल्पनाही नव्हती. त्यांनी मुकाट्याने टाईपरायटर पुढे ओढला आणि कामाला सुरुवात केली. जॉन कुणाशी तरी टेलिफोनवरून बोलत असावा. मध्येच केव्हातरी त्याचे बोलणे थांबले आणि एकाएकी तो मिसेस लिंकनच्या टेबलाशी येऊन उभा राहिला. मिसेस लिंकनने वर पाहिले. त्यांच्या मनात आले, ‘ अगबाई, हा आगामी अध्यक्ष अगदीच पोरसवदा दिसतो आहे आणि लठ्ठही नाही मुळीच ! अगदी सडपातळ आहे. ’

जॉनने राखी रंगाचा सूट घातला होता, पण त्याला तो सूट इतका बोंगळ होत होता की, तो त्याने दुसऱ्या कुणाचा तरी घातला असावा असे वाटत होते. बोलता बोलता कपाळावर येणारे दाट केस पुनः पुन्हा हाताने मागे सारायची सवय त्याला होती. त्याने मिसेस लिंकनना त्यांचे नाव आणि कामाचे स्वरूप विचारून घेतले. मग तो म्हणाला, “ जाताना तेवढे

दार लावून जा." तो केव्हा निघून गेला हेही बिचाऱ्या लिंकनबाईंना कळले नाही, इतक्या चपळाईने त्याचे येणे, बोलणे आणि जाणे एवढ्या क्रिया झाल्या.

मिसेस लिंकनबाईंना जॉनचे सेक्रेटरीपद मिळाले. पण हे काम सोपे नव्हते. जॉनसारख्या माणसाच्या सेक्रेटरीचे काम म्हणजे अक्षरशः तारेवरची कसरत होती, हे लवकरच त्यांच्या ध्यानात आले. तो सीनेटवर निवडून आल्यावर त्याचा शपथविधी व्हायचा होता. त्या दिवशी त्याने लिंकनबाईंना बरोबर यायला सांगितले. सीनेटमध्ये सगळे बुड्ढे मुरब्बी राजकारणी जमले होते. त्यांच्या मानाने जॉन म्हणजे अगदीच पोर आणि नवखा. थोडासा भांबावला होता तो, पण लवकरच त्याने स्वतःला सावरले. लिंकनबाई अजून त्यांच्या कामाला फारशा सरावल्या नव्हत्या. अगदी नवीन होत्या. पण जॉनच्या ते लक्षातही नव्हते. तो आपला फैरी झाडत होता, 'मिसेस लिंकन, ते अमकं कुठंय्? तो तमका कागद कुठाय्? ते हे स्टेटमेंट आणून द्या.'

बिचाऱ्या लिंकनबाईंचे डोके फिरायची वेळ आली. कसेबसे त्यांनी ते काम उरकले आणि सुटकेचा निःश्वास टाकला.

मोठेपणाबरोबरच प्रसिद्धीही जॉनच्या वाट्याला अमाप येऊ लागली. वृत्तपत्राचे लोक सारखे त्याच्या मागावर राहू लागले. मोठ्या लोकांना वृत्तपत्राचे लोक म्हणजे ससेमिराच वाटतो. ते कसे गोंधळवून टाकतील याचा नेम नसतो. मग कित्येकजण त्यांच्यावर चिडतात-डाफरतात. पण जॉनने एका काळी वृत्तपत्रीय कामाचा अनुभव घेतला होता. त्यामुळे तो वृत्तपत्राच्या लोकांवर चिडत नसे. त्यांना हाकलूनही देत नसे. क्वचित् प्रसंगी त्याच्यावर टीका असली की तो आपल्या मदतनीसाला—टेड सॉरनेसेनला बोलावून सांगत असे, "टेड, हे बघितलंस काय लिहिलं आहे या वृत्तपत्रानं. त्यांना सगळी खरी हकिगत असेल ती कळवून टाक." मग काय विचारता. एक तासभर सगळी ऑफिसे त्या कामाला लागायची आणि तासाभरात भले मोठे पत्रक तयार होऊन वृत्तपत्राकडे पाठवले जायचे. जॉनचे डोके नेहमी निरनिराळ्या

योजनांनी भरलेले असायचे. कामाचा उरक त्याला फार होता. कोणत्याही गोष्टीत विलंब चालत नसे त्याला. ऑफिसात आल्या आल्या ओव्हरकोट काढता काढताच तो सांगायचा,

" मिसेस लिंकन, आज बरीच कामं आहेत, घ्या लिहून. " आणि यादी भराभर सुरू व्हायची. लिंकनबाईंची त्रेधा उडायची. एवढे झाले की मग तो टपालाकडे वळायचा.

एका जागेवर स्वस्थ बसणे त्याला अजिबात मानवत नसे. आलेल्या टपालाला उत्तरे द्यायची असत. ती उत्तरे तो लिंकनबाईंना तोंडी सांगत असे. त्या ती उतरून घेत, मग टाइप करत. पण तोंडाने उत्तरे सांगताना तो कधी एका जागी बसलाच नाही. खोलीतल्या खोलीतच नव्हे तर मध्येच बाहेरच्या खोलीतही तो चक्कर टाकून येत असे. कधी खिडकीबाहेर बघत रहा, कधी गोल्फची काठी हातात घेऊन हवेतल्या हवेत चेंडूला मारण्याचा आविर्भाव कर—असल्या त्याच्या हालचाली सारख्या चालू असत. पण विशेष हे की, त्याच्या शब्दांचा प्रवाह कधी खंडित होत नसे. लिहून न ठेवताही तो जे बोलत असे ते अगदी बिनचूक असे. कधी कधी तो काही गोष्टी लिहून ठेवीतही असे. पण त्याचे हस्ताक्षर लिंकनबाईला कित्येकदा ओळखत नसे. शिवाय स्वभावाने तो अत्यंत अव्यवस्थित होता. कोणतीही वस्तू जागच्या जागी ठेवणे त्याला कधी जमले नाही. एखादा टेलिफोन नंबर घाईघाईने तो एकाद्या चिठोऱ्यावर लिहून घेत असे आणि खिशात कोंबत असे. पण कधी तो नंबर काढायची वेळ आली तर तशा प्रकारच्या असंख्य चिठोऱ्या त्याच्या खिशातून बाहेर पडत. मग तो गोंधळून लिंकन-बाईंनाच विचारायचा, " मिसेस लिंकन, टॉमचा टेलिफोन नंबर काय ? " बिचाऱ्या बाईला टॉम हाच मुळी कोण ते माहीत नसायचे. मग नंबर कुठून काढणार ? त्याही घाबरून जायच्या.

जॉनला वस्तू विसरायची आणि कुठेही टाकून ठेवायची सवय होती. कोणती वस्तू कुठे टाकावी याला मर्यादाच नसे. एकदा जॅकीला भेट देण्यासाठी म्हणून त्याने हिऱ्याची सहा कंकणे आणवली. त्यातली तिला

आवडतील ती तीन ठेवायची, बाकी तीन परत पाठवायची असे ठरले. दुसऱ्या दिवशी जॅकीने कोणती कंकणे पसंत केली, कोणती कंकणे परत करायची हे जॉन सांगेल म्हणून लिंकनबाई वाट पहात राहिल्या. पण तो काहीच बोलला नाही. त्यांना वाटले जॉनने स्वतःच बहुधा परत पाठवली कंकणे. त्याही गप्प बसल्या. पण मध्येच गाडीचा क्लीनर आला आणि लिंकनबाईजवळ त्याने एक पुडके दिले. तो म्हणाला, " हे मला गाडीत सापडले. " ती हिऱ्याची तीन कंकणे गाडीतच टाकून जॉन गेला होता. या कंकणाची किंमत जवळजवळ त्या आलीशान गाडीइतकी होती हे त्या बिचाऱ्या क्लीनरला ठाऊकही नव्हते.

हा गबाळेपणा त्याच्या छोट्या गोष्टीतही दिसायचा. ऑफिसच्या आतल्या बाजूच्या खोलीत एक कोच ठेवला होता. काम करता करता त्याला थकवा आला की, तो त्या कोचावर पडून झोपी जायचा. बाहेर जायच्या वेळी त्याला उठवले की, तो इतरांनाच घाई करायचा. हातात सापडलेला एकच मोजा दाखवून तो विचारायचा, " माझा दुसरा मोजा कुठंय् ? " मग सगळयांची त्या मोज्यासाठी धावपळ सुरू व्हायची. बुटाचेही असेच असायचे. एक बूट सापडला तरी दुसरा जोडीचा बूट कधीच तिथे सापडत नसे.

शिवाय त्याला कुणी त्याचे सामान व्यवस्थित लावलेलेही आवडत नसे. एकदा लिंकनबाईने त्याचे सगळे टेबल छान आवरून व्यवस्थित ठेवले. तेव्हा आल्यावर तो त्यांच्यावरच ओरडला, " माझं टेबल कुणी आवरलं ? आता मला माझी वस्तू यात हवी असेल तेव्हा कशी सापडणार ? यापुढे माझ्या टेबलाला कुणी हात लावायचा नाही. " लिंकनबाईंनी कपाळाला हात लावला.

त्याला बाहेर जायचे असले की, लिंकनबाई त्याला वेळेची आठ-वण करून देत. शेवटी विमान सुटायला वीस मिनिटे राहिली की, त्या अंतिम सूचना द्यायच्या. पण तरी त्याचे बोलणे आपले चालूच असायचे. जणू काही विमान सुटायला वीस मिनिटांऐवजी आणखी तब्बल दोन तास

आहेत ! मग एकाएकी बोलणं थांबवून तो उठायचा आणि सगळ्यांची धावपळ सुरू व्हायची. भराभरा पुस्तके, पत्रे, मासिके आपल्या ब्रीफकेसमध्ये कोंबत तो जणू कित्येक महिन्यांच्या प्रवासाला जाणार असल्याच्या आविर्भावात निघायचा. तो बाहेर पडला की, सगळेजण नि:श्वास टाकत. पण एवढ्यात स्वारी घाईने आत येत असे. "मिसेस् लिंकन, विमानतळावर फोन करा मी निघालोय् म्हणून. मला जेवायला काय काय लागेल तेही कळवून टाका. मी पोचणार केव्हा तेही कळवून द्या."

जॉनला गाडी चालवायची फार हौस होती. विमानतळाकडे जाताना स्वत: गाडी चालवत असे. पण ती इतक्या वेगाने हाकत असे की, लोकांना वाटावे कुणी गुन्हेगार गाडी हाकतोय्, त्याच्या मागे पोलीस लागलेत ! पोलिसांचे संकेत तो जेमतेम संभाळत असे.

१९५४ मध्ये काँग्रेसचे दुसरे अधिवेशन सुरू झाले, तेव्हा जॉनला कामाचा फार ताण पडू लागला. ऑफिसातून घरी जायला त्याला फार उशीर होऊ लागला. बरेच दिवस असे चालले, तेव्हा जॅकी काळजीत पडली. तिने लिंकनबाईला फोन करून म्हटले, 'मिसेस लिंकन, जॉनला ही रोजची जागरणे सोसणार नाहीत, त्याला जरा घरी लवकर यायला लावा.' लिंकनबाई म्हणाल्या, 'ठीक आहे, मी प्रयत्न करते.'

त्या असे म्हणाल्या खऱ्या. पण त्याचा काही उपयोग होणार नाही हे त्यांना पक्के माहिती होते. कारण थोडे दिवस जॉन लवकर घरी गेला. पण नंतर येरे माझ्या मागल्या. शेवटी जॅकीनेच माघार घेतली.

जॉनच्या स्वभावात विसरभोळेपणाही होता. पण त्यामुळे कित्येकदा विलक्षण प्रसंग यायचे. एकदा बाल्टिमोरच्या एका वाहतूक कंपनीतून फोन आला. मिसेस लिंकनने फोन घेतला. पलीकडून कोणीतरी बोलत होते, "तुमच्या ऑफिसात एक मासा आणून पोचवायची आम्हांला ऑर्डर दिली आहे. तेव्हा तुम्ही ऑफिसात किती वेळ असाल ?'

लिंकनबाई चांगलीच गोंधळली. ऑफिसात मासा आणला तर काय

गोंधळ होईल हेच तिला उलगडेना. पण एवढयात तिच्या लक्षात आले, जॉनला निरनिराळे पदार्थ करून खाऊ घालायची जॅकीला फार हौस होती. आताही तिने अशीच काहीतरी सुरसुरी येऊन खास मासा मागवला असावा म्हणून ती म्हणाली, ' माफ करा. तुमची काहीतरी चूक होते आहे, मासा घरी मागवला असेल, घरचा पत्ता ध्या. '

रात्री लिंकनबाई नवऱ्याला ही गमत सांगत बसल्या होता. एवढयात फोन खणाणला. पलीकडून जॉन विचारत होता,

' मिसेस लिंकन, तो मासा माझ्या गॅरेजमध्ये काय करतोय ? तेथे कसा आला तो ? सबंध तबेल्याबाहेर व्हरांड्यापर्यंत ऐसपैस पसरला आहे. '

लिंकनबाईला हा घोटाळा उलगडेना. पण नंतर चौकशी केली. तेव्हा तिला कळलं की, हा मासा खाण्याचा नसून भला थोरला ९ फुटांचा सेलफिश आहे. जॉन आणि जॅकेलिन मधुचंद्राला गेले असताना जॉनने या माशाची शिकार केली होती. म्हणून जॅकीने मोठ्या कौतुकाने त्यात पेंढा भरून तो ऑफिसात शोभेसाठी ठेवायला सांगितले होते. पण जॉनने याबद्दल कुणालाही काहीच सूचना दिली नव्हती. त्यामुळे हा घोटाळा झाला.

जॉनच्या विसराळू स्वभावाचे नमुने बघण्यासारखे होते. एक दिवस ऑफिसच्या आतल्या बाजूला खोलीत आंघोळ करण्यासाठी म्हणून त्याने टबमध्ये नळ सोडला आणि कुणाजवळ तरी फोनवर बोलू लागला. थोड्या वेळाने श्री. हॅरोल्ड लिंकन काही कामासाठी त्या बाजूने चालले होते. ऑफिसबाहेर तळे झालेले दिसले. प्रथम हे पाणी अचानक कुठून आले, तेच कळेना. नंतर सगळीकडे शोध केल्यावर कळले की, टबमधून पाणी भरभरून वाहत आहे आणि जॉन तरीही फोनवर बोलतच होता. त्याला ना कशाची दाद ना फिर्याद.

१९५४ साली त्याला पुन्हा पाठीच्या दुखण्याचा त्रास होऊ लागला. ऑक्टोबरमध्ये त्याचे ऑपरेशनही झाले. याच वेळी श्रीमती लिंकन यांनाही अतिश्रमाने चक्कर येत होती. त्यांना काही दिवस रजा घेऊन

हॉस्पिटलमध्ये पडून रहावे लागले. त्यांना वाटले की, जॉन आता परत आपल्याला कामावर ठेवणार नाही. त्यांना फार वाईट वाटले. जॉनचे काम करायला त्यांना त्रास पडे, पण ते काम आवडतही होते. जॉन त्यांची नेहमी हॉस्पिटलमध्ये चौकशी करत असे. विशेष म्हणजे त्या बऱ्या झाल्यानंतर त्याने पुन्हा त्यांना कामावर ठेवले. दुसऱ्याच्या भावना तो नेहमी समजून घेत असे.

१९५६ मध्ये निवडणुकीत जॉन डेमोक्रॅटिक पक्षाचा उपाध्यक्ष म्हणून निवडून आला. १९५८ साली निवडणुकीत मॅसॅच्युसेट्स् परगण्यांतून तो सिनेटवर प्रचंड बहुमताने निवडून आला. याच सुमाराला पुढच्या निवड-णुकीसाठी अध्यक्ष म्हणून त्याच्या नावाचा उल्लेख होऊ लागला. जॉन आपल्या उद्दिष्टाची एकेक पायरी चढत होता. त्याच्या चिकाटीचे आणि धाडसाचे हे फळ होते. गिरिकंदरातून, काट्याकुट्यातून कशाचीही तमा न बाळगता बेदरकारपणे उड्या घेत जाणाऱ्या एखाद्या निर्मळ झऱ्यासारखे त्याचे जीवन होते. करंगळीएवढया इवल्याशा धारेचे महान् जलराशीमध्ये रूपांतर होत होते. पण त्याचा नितळपणा मात्र तसाच होता. राजकारणासारख्या वक्रनीतीतही जॉन आपल्या वडिलांसारखाच वागत असे. जॉनचे वडील अतिशय मोकळ्या स्वभावाचे होते. परराष्ट्रीय वकील या नात्याने बोलतानाही ते आपले विचार धाडशीपणाने आणि बेडरपणाने व्यक्त करीत. आपल्या सर्व कल्पना आणि राजकारणातले डाव उघड झाले तरी त्यांना त्याची पर्वा नसे. जॉननेही अशीच चूक एकदा केली. डेमोक्रॅटिक पक्षातर्फे आगामी अध्यक्षपदासाठी तिकीट मिळवताना जॉन मॅक कॉरमॅक या सदस्याबरोबर त्याला फार झगडा करावा लागला. पण जॉनने खुशाल ही गोष्ट उघडपणाने सांगून टाकली. अर्थात् विरोधकांनी याचा फायदा घेतला. चोहीकडून जॉनवर अक्षरश: राळ उडवण्यात आली. इतकेच नव्हे तर बर्क या उमेद-वाराने या गोष्टीचा फायदा आपल्या प्रचारासाठी करून घेतला. एक लक्षाधीश माणूस पैशाच्या जोरावर डेमोक्रॅटिक पक्षाची सूत्रे हातात घेत आहे, त्याला हुकूमशहा बनून अनियंत्रित सत्ता गाजवायची आहे, असा प्रचार त्याने सुरू केला. आपल्या मनमोकळेपणाची फार मोठी किंमत

जॉनला द्यावी लागली. त्याला फार मनस्तापही झाला. पण विरोधकांच्या या प्रचाराला सर्व सामर्थ्यानिशी न डगमगता त्याने तोंड दिले. जेव्हा डेमोक्रॅटिक पक्षाने अध्यक्षपदासाठी पक्षातर्फे नाव निश्चित करण्यासाठी निवडणूक घेतली त्यात जॉनला एकेचाळीस मते पडली. जॉनच्या यशाचे खरे रहस्य त्याच्या चारित्र्यात आहे. १९६० सालच्या अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी जॉनचे नाव निश्चित झाले. वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, व्यासपीठे या सर्व ठिकाणी जॉनच्या नावाचा सतत गजर होऊ लागला. जॉन केनेडीविरुद्ध निक्सन हा उमेदवार उभा होता. सामना मोठा चुरशीचा होता. या निवडणुकीकडे सगळ्यांचे डोळे लागून राहिले होते. दोघेही प्रतिस्पर्धी बलाढ्य होते. त्यामुळे मतदानाच्या मोजणीत यशाचे पारडे कधी या बाजूला, तर कधी त्या बाजूला झुकत होते. वातावरणात ताण पसरला होता. अखेर यशोदेवतेने जॉनच्या गळ्यात माळ घातली. निवडणुकीचा निकाल लागण्यापूर्वी सगळ्यांच्या मनावर ओझे होते. निकाल लागताच ते उतरले.

अमेरिकन नागरिकांच्या मनात जॉनची राजकीय मूर्ती किती प्रभावीपणे ठसली होती याचेच हे प्रतीक होते. जॉन केनेडी कसा वाटतो असा प्रश्न कित्येकांना केला असताना त्याच्याबद्दल " अत्यंत उत्साही, प्रज्ञाशील, देखणा, उज्वल चारित्र्याचा, खानदानी, आक्रमक वृत्तीचा, स्फोटक, ज्वलंत परंतु प्रामाणिक विचाराचा, धडाडीचा पुरुष " इत्यादी गौरवपूर्ण विशेषणे वापरली जात. जॉनची मते अगदी ठाम असत. कोणतीही गोष्ट पूर्ण विचार केल्यानंतर मांडायची सवय त्याला लहानपणापासूनच होती. आपली मते सखोल अभ्यासाने तो बनवत असे. आणि एकदा मत बनल्यानंतर तो ते स्पष्ट शब्दात मांडायला भीत नसे. यामुळेच त्याच्याबद्दल अमेरिकन जनतेत एक विश्वास निर्माण झाला होता.

निवडणुकीत जॉन निवडून आला त्या वेळी सगळ्यांनी निःश्वास सोडला. या निवडणुकीसाठी जॉनने अमाप कष्ट घेतले होते. निकाल जाहीर झाल्यानंतर सकाळची गोष्ट. तीन वर्षांची छोटी कॅरोलीन आणि जॅकी दारात उभी होती. समोरून जॉनला येताना पहाताच कॅरोलीनने 'पपा'

करून हात हलवला. जॅकेलीन प्रसन्नपणे हसली आणि हलक्या मधुर आवाजात म्हणाली, " Good morning Mr. President ". जॉनचे अंतःकरण प्रफुल्लित झाले. स्मितहास्य करत त्याने अभिनंदनाचा स्वीकार केला आणि आजूबाजूला पाहिले. अरे बापरे ! वर्तमानपत्रं, टेलिव्हिजन यांचे प्रतिनिधी, शेजारीपाजारी आणि इतर कित्येक लोकांनी भेट घेण्यासाठी अगदी गर्दी करून सोडली होती. आदराने भरलेल्या सर्वांच्या नजरा त्याच्याकडे लागल्या होत्या. त्याच्या नजरेसाठी, हास्यासाठी, तोंडातून बाहेर पडणाऱ्या एखाद्या शब्दासाठी सारेजण चातकासारखी वाट पहात होते, पण····

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम................. दि .................
क्रमांक .................नोंद दि.................

# ४

## विश्वाचे विश्वासस्थान

एवढ्या प्रचंड गर्दीत एकाच व्यक्तीला त्याच्या मोठेपणाचा पत्ता नव्हता. आपला पिता केवढ्या मोठ्या दर्जाला पोचला आहे, हे चिमुकल्या कॅरोलीनच्या खिसगणतीतही नव्हते. इतर कोणत्याही वेळी कॅरोलीनच्या तावडीतून जॉनने आपली सुटका करून घेतली असती, पण आज मात्र ती अजिबात ऐकायला तयार नव्हती. आपल्या वडिलांचा हात घट्ट धरून तो हलवत ती म्हणाली, "पपा, चला ना फिरायला." हे गोड रेशमी बंधन तोडणे जॉनला सर्वस्वी अशक्य होते. शेवटी तो म्हणाला, "बरं जाऊ या, पण फार लांब जायचे नाही बरे का! मला आज खूप कामे आहेत आणि माणसेही थांबली आहेत बरीच माझ्यासाठी." कॅरोलीनने काहीच उत्तर दिले नाही. कारण तिचा हेतू साध्य झाला होता. एकदा वडिलांचा रुकार मिळाला होता आणि त्यांचा हात हातात आला होता. इतर गोष्टींची मग पर्वा कशाला? कामे आणि माणसे यांचे काय मोठेसे? थांबतील आणखी थोडा वेळ. तिच्या लेखी बाबांच्याबरोबर फिरणे एवढीच जगातली अत्यंत महत्त्वाची गोष्ट होती. कॅरोलीन आणि एका मोठ्या देशाचा फार मोठा पुरुष दोघेजण हातांत हात घालून शांतपणे पावले टाकू लागले. पण आता दुसरी पंचाईत आली. कारण वेडया कॅरोलीनने हट्ट धरला, "पपा, तुम्ही घोडा व्हा ना. मला पाठीवर बसायचे तुमच्या."

सगळ्या जगाच्या दृष्टीने अमेरिकेसारख्या देशाचा तो महान् अध्यक्ष होता. पण कॅरोलीनच्या दृष्टीने मात्र फक्त 'पपा' होता. एका बलाढ्य

देशाचा तो निरंकुश सत्ताधारी हसला आणि चक्क घोडा होऊन जमिनीवरून गुडघे टेकत चालू लागला. मोठ्या रुबाबात कॅरोलीन वडिलांच्या पाठीवर बसली. हातातला खोटा खोटा चाबूक वाजत होता कडाड् कडाड्. ती ऐटीने आपल्या मुलखावेगळ्या नाठाळ घोडयाला चुचकारू लागली, " चक् च्यक् च्यक् " आणि पाठोपाठ कॅमेऱ्यांचे आवाज येऊ लागले. " क्लिक क्लिक क्लिक. " वर्तमानपत्रांतून जेव्हा फोटोसहित ही कथा प्रसिद्ध झाली तेव्हा अमेरिकेतल्या प्रत्येक मातापित्याचे हृदय कौतुकाने भरून आले. ज्या देशातून, राज्यातून, शहरातून जॉनने भेटी दिल्या होत्या, तिथे तिथे आपल्या विरुद्ध पक्षाच्या कार्यासंबंधी हिरीरीने भांडताना लोकांनी त्याला पाहिले होते. खंबीर हृदयाचा आणि पोलादी सामर्थ्याचा व व्यक्तिमत्वाचा पुरुष म्हणून लोक त्याला ओळखत होते. जलद विचार, प्रवाही भाषण, सत्य घटनांची बिनचूक ताळेबंदी, मोजके आणि आवश्यक तेवढेच बोलणे अशा गुणराशींनी एकवटलेला हा माणूस आता यशोमंदिराच्या शिखरावर होता. पण 'वज्रादपि कठोराणि' अशा या पुरुषाचे तितकेच 'मृदूनि कुसुमादपि' असे हे दुसरे दर्शन आगळे होते, विलोभनीय होते. कठोर हृदयाचा हा लोहपुरुष कोणत्याही एका सामान्य पित्याप्रमाणे आपल्या मुलीच्या इवल्याशा इच्छेचाही बंदा गुलाम होता. आपल्या या चिमुकल्या सम्राज्ञीची सेवा चोख बजावल्यानंतर जॉन केनेडीने तिथे जमलेल्या साऱ्यांचे आभार मानले. त्यांच्या अभिनंदनाचा स्वीकार करून तो म्हणाला, " आगमी चार वर्षं अमेरिकन जनतेला बिकट जाणार आहेत. निवडणूक पार पडली आहे. तथापि १९६० साल आणि त्यानंतरचा काळ यांतून देशाला सुरक्षितपणे बाहेर काढायचे असेल तर सर्वांनी राष्ट्रीय पातळीवर आत्यंतिक प्रयत्न करायला हवेत, याबद्दल कुणाचेही दुमत होणार नाही. "

त्याचे शब्द मोठे वेचक, अर्थपूर्ण पण मोजके असत. या वेळी त्याच्या चेहऱ्यावर कठोर निश्चयाचे तेज झळकत होते. गंभीर आवाजात त्याने प्रतिज्ञा केली, " अमेरिकेच्या अंतिम कल्याणासाठी आणि जागतिक स्वातंत्र्यासाठी माझे तन आणि मन मी अर्पण करीन. "

अमेरिकेचा अध्यक्ष या नात्याने त्याने दिलेला हा पहिलाच संदेश होता. सर्वांची अंत:करणे भारावली होती. एक प्रकारचा थकवा त्याला जाणवत होता. वातावरणात गांभीर्य आणि भावनांचा ताण पसरला होता. एक क्षणभर तो थांबला. एकाएकी त्याच्या चेहऱ्यावर मिस्किल आणि खोड-कर हास्य पसरले. किंचित् झुकून गर्दीतल्या सगळ्या चेहऱ्यावर नजर फिरवीत तो म्हणाला, " आता आम्हांला दोघांनाही कामाला लागायचेय्. पुढची तयारी करायची आहे. मला नव्या शासनव्यवस्थेच्या तयारीला आणि माझ्या पत्नीला नवीन जन्माला येणाऱ्या आमच्या नव्या अपत्याच्या तयारीला. " वातावरणातला थोडासा ताण नाहीसा झाला. जमलेल्या लोकांच्यात हास्याची खसखस पिकली आणि या खेळकर क्षणाची छाया-चित्रे पटापट टिपली गेली.

अमेरिकेचा ३५ वा अध्यक्ष म्हणून जॉन केनेडीने २० जानेवारी १९६१ मध्ये शपथ घेतली. वैयक्तिक जीवनासारखेच त्याचे राजकीय आयुष्यही सतत जिवंतपणामुळे भरलेले होते. जॉनच्या घराण्यात महत्त्वाकांक्षा परंपरेनेच चालत आलेली होती. १९६० सालच्या २५ नोव्हेंबरला जॉनला मुलगा झाला. त्या वेळी जॉन भलताच खुशीत होता. लिंकनबाईने त्याचे हसून अभिनंदन करीत म्हटले, " छोट्या जॉन केनेडीच्या आगमना-प्रीत्यर्थ अभिनंदन. " यावर तो मान हलवून म्हणाला, " छोटा जॉन 'केनेडी' नाही. कदाचित् तो अब्राहाम लिंकनही होईल. " दुसऱ्या दिवशी देशाच्या कोनाकोपऱ्यातून जॉनवर अभिनंदनाच्या तारांचा नुसता पाऊस पडला. त्या तारांना उत्तरे देताना टाइप करता करता लिंकनबाईंची बोटे थकून गेली. टाइपिंग करताना तिला पाहून कॅरोलीनने आर्जवीपणाने विचारले, " मी बघू का टाइप करून ? " त्या गोड पोरीला नकार देणे लिंकनबाईंना शक्य नव्हते. तिने होकार दिला. मग काय ? चिमुकल्या कॅरोलीनची बोटे धडाधड वाटेल तशी टाईपरायटरवर आपटू लागली आणि काही मिनिटांतच टाइपरायटरचा निकाल लागला. त्यानंतरच्या सोमवारी कॅरोलीनचा वाढदिवस होता. तिच्या पार्टीला लिंकनबाई गेल्या होत्या. ती बाईंना म्हणाली, " मला कागदावर चित्र काढायला शिकवा ना. " मग

एक कागद आणि पेन्सिल घेऊन बाईसाहेब चित्र शिकायला बसल्या. मोठ्या रुबाबात एकदा डाव्या हाताने, एकदा उजव्या हाताने रेघोट्या सुरू झाल्या. जास्तकरून डावा हात उपयोगात येत होता. काही वेळ नुसत्या रेघोटया झाल्या. मग गोलगोल गिरगिटून झाले. मग लिंकनबाईंना आज्ञा झाली, " मांजराचे चित्र काढून द्या. " लिंकनबाई काही मोठ्या चित्रकार नाही. त्यांनी जमले तसे आपले चित्र काढून दिले. पण बाईसाहेबांच्या मनाला आले नाही. नाक मुरडून ती म्हणाली, " हे काय मांजर आहे का ? नाहीच मुळी. "

" का ग, काय झाले याला ? " लिंकनबाईंनी आश्चर्याने विचारले.

" मांजराला मिश्या असतात मोठाल्या. या मांजराला कुठं आहेत मिशा ? " मोठेपणाचा आव आणून कॅरोलीनने समजावले. एवढ्याने भागले नाही. टेलिफोनवरून लिंकनबाई उत्तरे देत असताना एकीकडे सारा दिवसभर मांजराची चित्रे काढत बसायची त्यांना शिक्षा मिळाली. अशी ही कॅरोलीन मोठी मिस्किल आणि खोडकर—अगदी आपल्या वडिलांसारखी. बोलण्यात मोठी पटाईत.

तिच्या वडिलांचाच गुण तिने उचलला असावा असे वाटते. कारण जॉनला देखील बोलण्याचा इतका सराव होता की, आयत्या वेळी भाषण करतानाही तो पूर्ण तयारी केल्यासारखा छान बोलायचा. पण तरी देखील उगाचच भाषणाची तयारी करण्याची त्याला सुरसुरी यायची. कुठली कुठली पुस्तकातली, मासिकातली पाने फाडून तो मिसेस लिंकनजवळ द्यायचा आणि गंभीरपणे सांगायचा, " हे ठेवून द्या, पुढे उपयोगाला येईल. " मग कधीतरी चारसहा महिन्यांनी त्याला आठवण यायची आणि पटकन् तो विचारायचा, " मिसेस् लिंकन, तो अमका अमका कागद मी दिला होता. कुठं आहे तो ? " बिचाऱ्या लिंकनबाईंची त्रेधातिरपीट उडायची.

जॉनच्या स्वभावात अव्यवस्थितपणा आणि टापटीप यांचे मोठे

विलक्षण मिश्रण होते. पोषाखाबाबत जॉन गबाळेपणा करायचा. पण जेवणाबाबत वेगळी तऱ्हा होती. लग्न झाल्यावर जॅकी घरून जेवणाचा डबा ऑफिसात पाठवून द्यायची. मग ते जेवण लिंकनबाई टेबलावर टेबलक्लॉथ घालून व्यवस्थित मांडायच्या आणि जेवणारांना छान वाढायच्या. ऑफिसातही घरच्यासारखे रुबाबात जेवण व्हायचे. आणखीही कित्येक छोटया छोटया गोष्टींत जॉनला टापटिपीने वागायची लहर येत असे. एकदा टेलिव्हिजनचे लोक त्याच्याकडे एक भाषण चित्रित करून घ्यायला आले होते. भाषण तयार झाले, कॅमेरे लागले, कोन साधला गेला, सगळी तयारी झाली. टेलिव्हिजन यंत्राचे दिवेही लागले. एवढ्यात त्याला कसलीतरी आठवण आली. त्याने लिंकनबाईला हलक्या आवाजात विचारले, " तुमच्याकडे कंगवा आहे का एखादा ? " तिने धावत-पळत जाऊन एक कंगवा आणून दिला. कंगवा एकवार त्याने हलकेच आपल्या केसांवरून फिरविला आणि मोठया ऐटीत आपल्याच खिशात टाकला. मग स्वारी भाषणाच्या कामात गर्क झाली.

कित्येक मोठया गोष्टींत जॉन विसराळूपणाने वागायचा. पण कित्येकदा अगदी लहान लहान गोष्टींनी तो अस्वस्थ होत असे. एकदा तो लेबर कमिटीच्या सभेतून परत आला. त्याने लिंकनबाईला ऑफिसात बोलावले. त्याच्या चेहऱ्यावर अस्वस्थपणा दिसत होता. त्याच्या मनाला कसलीतरी टोचणी लागली होती. तो म्हणाला, " मिसेस् लिंकन, आताच मी हॉलमधून येत होतो. येताना श्रीयुत डॉड यांची पत्नी मला दिसली. पण मी तिच्याजवळ काहीच बोललो नाही. तिला काय वाटेल माझ्याबद्दल ? माझ्या मनाला ही गोष्ट लागली आहे. तेव्हा असं करा, मी सांगतो तसं एक पत्र लिहा त्यांना. " त्याने पत्र सांगायला सुरुवात केली, " मी कामाच्या खूप गडबडीत होतो; त्यामुळे आपल्याला एकदम ओळखलं नाही, याबद्दल क्षमा करा. पण अशा तऱ्हेची चूक खुद्द माझ्या पत्नीच्याही बाबतीत माझ्याकडून होण्याची शक्यता आहे इतका मी कामात व्यग्र आहे. " शिष्टाचार पाळण्याबाबत जॉन अतिशय जागरूक असे.

जॉन केनेडीच्या आयुष्याचा कोणताही पैलू चमकदार, वैभवशाली

आणि समृद्ध होता. त्याचे विचार अत्यंत निकोप आणि उच्च दर्जाचे होते. अमेरिकेचा अध्यक्ष झाल्यावर त्याने मोठ्या धडाडीने नव्या नव्या योजना हाती घेतल्या. त्याच्या या योजनांमागे संकुचित विचारसरणी कधीच नसे. उच्च मानवतावादी दृष्टिकोनातून त्याने आपल्या प्रत्येक योजनेची आखणी केली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर कित्येक राष्ट्रांना नव्याने स्वातंत्र्य मिळाले, तर कित्येक नवीन राष्ट्रेच उदयाला आली. हे सर्व देश गुलामगिरीच्या बंधनामुळे मागे राहिलेले होते. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय तिन्ही क्षेत्रांत त्यांचा विकास झालेला नव्हता. जोपर्यंत जगातली निम्मी लोकसंख्या दारिद्र्य, अज्ञान आणि गुलामगिरी यांच्या अंधारात पिचत आहे, तोपर्यंत स्वातंत्र्य आणि समता यांचा उद्घोष करणे फुकट आहे असे त्याचे मत होते. मात्र याच दृष्टिकोनातून परदेशांना मदत करण्याच्या अनेक योजना त्याने अस्तित्वात आणल्या. यासंबंधात ठिकठिकाणी आपल्या भाषणात तो तळमळीने माहिती देत असे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात तो जे कार्य करत होता, त्यांतही जागतिक, राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्याबद्दल त्याला वाटणारी तळमळ आणि आस्था दिसून येई. चिनी कम्युनिझमच्या वाढत्या धोक्याबद्दल तो सावध होता. तो म्हणायचा, ‘ सोव्हियट रशियाशी आमचे संबंध चांगले आहेत, तोपर्यंत आम्ही चांगले आहोत. पण जर लाल चिनीनं आपले हातपाय पसरायला सुरवात केली तर मात्र आमच्यासारखं वाईट कुणीच नाही. ’ यामुळेच ज्या वेळी चीनने भारतावर स्वारी केली, त्या वेळी भारताच्या मदतीला जॉन केनेडी धावून आला. अमेरिकेचा अध्यक्ष म्हणून जेवढा काळ जॉन सत्तेवर होता, तो काळ राजकारणातल्या दुष्ट चक्रावर विजय मिळण्याचा, शांततेसाठी आशादायक वातावरण निर्माण करण्याचा होता.

एवढे होते तरीदेखील अंतराळ-संशोधनाबाबत अमेरिकेने रशियाशी स्पर्धा करावी असेच त्याचे मत होते. याबाबतीत १९६३ साली त्याने नोव्हेंबर महिन्यात केलेल्या भाषणात उघड म्हटले, “ अंतराळ-संशोधनांचे अमेरिकेचे प्रयत्न चालू राहिलेच पाहिजे आणि चालू राहतीलही. ” या संदर्भात त्याने फ्रँक ओकोनार या लेखकाची एक गोष्ट सांगितली.

तो म्हणाला, "फ्रँक ओकोनार या आयरिश लेखकाने स्वतःच्या लहानपणीची गंमतीदार गोष्ट त्याच्या पुस्तकात लिहिली आहे. 'कोणताही बिकट मार्ग शोधून काढताना तो आणि त्याचे मित्र एक युक्ती करत. समजा, एखादी पडकी भिंत त्यांच्या वाटेत आली, त्यांना ही भिंत आपण पार करू की नाही याची शंका आली, तर ते काय करत? आपले मन विचलित होऊ नये म्हणून आपल्या टोप्या उंच भिंतीवर भिरकावून देत आणि मग साहजिकच टोप्या काढण्यासाठी त्यांना भिंत पार करण्याशिवाय दुसरा मार्ग रहात नसे. माझ्या देशबांधवांनो, अंतराळाच्या भिंतीवर आपणही आपल्या राष्ट्राची टोपी अशीच भिरकावून दिली आहे. आता आपल्या मार्गात कितीही संकटे येवोत, आपल्याला ही भिंत चढायलाच पाहिजे. तरच अज्ञातातला—अवकाशातला ज्ञानाचा प्रचंड, अमोल आणि आश्चर्यकारक ठेवा आपल्याला प्राप्त होईल."

तथापि जॉन आपल्या देशाच्या पुढे मांडत असलेल्या प्रत्येक योजनेबाबत जरूर तेवढी सावधगिरीही घेत असे. अमेरिकेचा हा लोकविलक्षण महापुरुष निश्चयी स्वभावाचा, राजकारणी तरुण, देखणेपणाचा वारसा घेऊन आलेला, खानदानी रक्ताचा, मुत्सद्दी, मानवतेचा पुजारी आणि शांतीचा उपासक होता. फक्त स्वतःच्या राष्ट्रातीलच नव्हे तर सर्व मानवजातीच्या हृदयातील शुद्ध प्रेम आणि विश्वास या भावना जॉन केनेडीने जागृत केल्या. 'अंधाराच्या साम्राज्यावर प्रकाशाला विजय मिळवून देणारा' असे त्याच्याबद्दलचे गौरवोद्गार अगदी सार्थ आहेत.

नवविकसित राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय मदत योजनांतर्फे त्याने अमाप मदत दिली. जागतिक स्वातंत्र्याचा तो पुरस्कर्ता होता. त्याबरोबरच अमेरिकन तरुणांनाही आंतरराष्ट्रीय सहयोग जीवनाची, आस्थेची नवी जाणीव त्याने निर्माण करून दिली. त्याने काढलेल्या शांततादलात हजारो अमेरिकन तरुण-तरुणी सामील झाले होते. सर्व राष्ट्रांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रगतीसाठी त्याने मदत दिली. कोणत्याही राष्ट्राला स्वतःची घटना निर्माण करण्याचा आणि स्वतःचा विकास करून घेण्याचा हक्क आहे असे त्याचे ठाम मत होते आणि याच दृष्टिकोनातून

त्याने कित्येक नवविकासित राष्ट्रांना आर्थिक आणि तांत्रिक बाबतींत मदत दिली. जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी आणि ती स्थिर राखण्यासाठी त्याने अतोनात प्रयत्न केले. उत्कृष्ट, सुव्यवस्थित, सुसंघटित असे सुंदर जग निर्माण करण्याचे त्याचे स्वप्न होते.

स्वत:च्या देशातल्या समस्यांबाबतही त्याचा दृष्टिकोन अत्यंत उदार होता. अमेरिकेची आर्थिक आणि सामाजिक घडी खऱ्या अर्थाने सुव्यवस्थित करायला हवी असेल तर अमेरिकन निग्रोंना सामाजिक हक्क द्यायला हवेत, हे तो जाणून होता. अमेरिकन निग्रोंबाबत त्याचे धोरण शुद्ध मानवतावादी स्वरूपाचे होते. दोन निग्रो विद्यार्थ्यांना अमेरिकन विद्यापीठात प्रवेश मिळवून देण्यासाठी त्याने स्वत: खटपट केली होती. अब्राहाम लिंकनचा आदर्श त्याच्यासमोर होता. परंतु त्याचे हे मानवतावादी, उदारमतवादी धोरण अमेरिकेच्या काही संकुचित आणि स्वार्थी मनोवृत्तीच्या प्रदेशात नापसंत होते. अशा विभागात जॉनच्या विरुद्ध विषमय वातावरण निर्माण होत होते. टेक्सास हा त्यातलाच एक प्रदेश होता. टेक्सासमध्ये जॉन केनेडीने पुरस्कृत केलेला उमेदवार आणि विरुद्ध बाजूचा उमेदवार यांच्यात फार मोठा संघर्ष निर्माण झाला होता. टेक्सासमधले सगळे वातावरण दूषित होऊन गेले होते. जॉन केनेडी आणि त्याचे धोरण याबाबत विरोधी वारे तेथे वाहत होते. अशा तंग वातावरणातच डलासला भेट द्यायचे जॉनने ठरवले. जॉनबरोबर जॅकेलीनही जाणार होती. जॅकेलीनचे तिसरे अपत्य नुकतेच मरण पावले होते. त्यामुळे जॅकी अतिशय दु:खात होती. डॉक्टरांनी तिला खरे म्हणजे विश्रांती घ्यायला सांगितले होते. परंतु तिच्या मनाला बसलेला धक्का अगदी ताजा होता. अशा वेळी जॉन तिच्यापासून दूर जाणार होता आणि तेही उघडउघड जेथे त्याचा द्वेष केला जात होता अशा ठिकाणी. तिला ते मुळीच पटले नव्हते. तिने थरथरत्या आवाजात जॉनला म्हटले, ‘ इतर वेळी मी कदाचित मानलं असतं. पण तुम्ही जेथे जात आहात तेथे कोणताही धोका होण्याची शक्यता आहे. जर काही बरंवाईट झालं तर तुमची-माझी ताटातूट आता सहन होणार नाही. ’ जॉनला तिच्या मन:स्थितीची कल्पना होती. त्याने तिला

बरोबर न्यायचे ठरवले. मात्र दोन्ही मुले बरोबर येणार नव्हती. कॅरोलिनची शाळा होती. ती शाळेत गेल्यानंतर काही वेळात जॉन आणि जॅकी दलासला जायला निघणार होते. शाळेत जाण्यापूर्वी कॅरोलीनने वडिलांच्या गळ्याला मिठी मारली आणि ' टाटा ' केला. पण आपल्या वडिलांना केलेला हा ' टाटा ' आता शेवटचा ठरणार होता याची त्या बिचारीला कल्पनाही नव्हती.

दलासला जायचे ठरल्यावर तेथे हवामान कसे आहे याची जॉनने चौकशी केली. कुणीतरी प्रथम सांगितले होते की, तेथे हिवाळा आहे. म्हणून गरम कपडे त्याने घेतले. त्याला स्वत:पेक्षा जॅकीची काळजी अधिक वाटत होती. कारण जॅकीचा या वेळचा प्रवास जास्तीत जास्त सुखकर व्हायला हवा होता, आरामशीर व्हायला हवा होता. म्हणून तो प्रत्येक बारीकसारीक गोष्टीची चौकशी करीत होता. काळजी घेत होता. जायला निघण्यापूर्वी कुणीतरी सांगितले, ' यानंतरचे दोन दिवस दलासमध्ये उन्हाळा जाणवेल. ' जॉन अस्वस्थ झाला. आता सगळे बदलायला हवे होते. पण कपड्यांच्या बाबतीत बदल करणे अशक्य होते. सामान केव्हाच हेलिकॉप्टरमध्ये जाऊन पोचले होते. शेवटी किंचित् अस्वस्थ मन:स्थितीतच तो विमानतळाकडे निघाला. ते जायला निघाले तो छोटा जॉन धावतच आई-वडिलांकडे आला आणि वडिलांच्या गळ्याला मिठी मारून, ' पपा, मला न्यानं बरोबर. ' त्याने हट्टच धरला. जॉनला त्याची समजूत काढीत बसावे लागले. छोट्या जॉनने त्या वेळी रेनकोट घातला होता. त्या गोंडस गोजिरवाण्या बाळाचे मन मोडून जाताना जॉनचे काळीज गलबलले. जॉनला घट्ट ओढून त्याचा पापा घेत तो म्हणाला, 'राजा, या वेळी तुला बरोबर नाही रे नेता येणार. पुढच्या वेळी नेईन हं. ' जॉनच्या मनात आले, ' छोट्या जॉनला आता बरोबर नाही नेता येणार खरं. पण थोडा मोठा झाल्यावर त्याला फिरायला यायचेच आहे आपल्याबरोबर. ' पण....तशी वेळ आता कधीच येणार नव्हती, हे छोट्या जॉनच्याच काय पण मोठ्या जॉनच्याही स्वप्नात आले नसेल.

दलास शहरातले वातावरण या वेळी अतिशय तप्त होते. रस्त्या-

रस्त्यांतून हजारो पत्रिका वाटण्यात येत होत्या. या पत्रिकांवर जॉनचे दोन फोटो छापलेले होते. एक समोरून आणि एक बाजूने. एखाद्या गुन्हेगाराला पकडण्यासाठी पोलिस जशा तऱ्हेचे पत्रक काढतात तशा स्वरूपाचे हे पत्रक होते. या पत्रिकेत वर मोठ्या अक्षरात छापले होते, " हा देशद्रोही माणूस पाहिजे आहे. " या शीर्षकाखाली ओळीने सात मुद्दे मांडलेले होते. जॉन केनेडी हा अमेरिकेच्या उच्चवर्णीयांच्या जगाचा कसा शत्रू आहे याचे विवरण त्यांत केले होते. संपूर्ण पत्रिकेची भाषा विषारी द्वेषाने भरलेली होती. दलासमधले एकंदर वातावरण जॉनविरुद्ध कसे दूषित झाले होते याचे नमुने पाहण्यासारखे आहेत. दलासच्या एका हायस्कूलमधल्या विद्यार्थ्यांना त्यांचे पालक बरोबर असतील तरच जॉन केनेडींची स्वागत-मिरवणूक पहायला किंवा त्यात भाग घ्यायला परवानगी होती. पण एका शिक्षिकेने सांगितले, " मी कोणालाही मिरवणुकीत जायला परवानगी देणार नाही. तुमच्या घरादारातले सगळेजण जरी गोळा होऊन परवानगी मागायला आले तरी मी परवानगी देणार नाही. काय वाटेल ते होवो. मी तर जाणार नाहीच; पण तुम्हांला कोणालाही मी जाऊ देणार नाही. या आगमन प्रसंगासाठी शाळेला सुटी मिळणार नाही. आपले तास ठरल्याप्रमाणे होतील आणि त्या तासाला अभ्यास घेतला जाईल. "

केवळ विशीच्या आतली ती तरुणी अगदी कोवळी आणि अननुभवी होती. पण तिचे अंतःकरण जॉनबद्दलच्या तीव्र द्वेषाने ओतप्रोत भरले होते. तर ती पुढे म्हणाली, " मला जर तो दिसला तर मी चक्क त्याच्या तोंडावर थुंकेन. "

टेक्सासमधल्या या भयानक वातावरणाची कल्पना कुणाला नव्हती असे नाही. उलट याबद्दलच्या निरनिराळ्या बातम्या हरघडी मिळत होत्या. पण तरीही होणारे चुकणार नव्हते. भवितव्यता अटळ होती.

◆ ◆ ◆

# ५

## " ओ......नो "

टेक्सास हा प्रदेश धनाढ्य अमेरिकन लोकांचा. अमेरिकेची निम्मी संपत्ती इथे साठलेली. जितकी संपत्ती अधिक तितकेच इथे गुन्हेगारीचे प्रमाणही अधिक. सगळ्या अमेरिकेत मिळून महिन्याकाठी जितके खून होतात, त्यांतले जवळजवळ निम्मे खुनांचे गुन्हे याच परगण्यातले. एका बाजूला गोरे अमेरिकन तर दुसरीकडे काळे निग्रो. अमेरिकेत माजलेल्या वर्ण-विद्वेषाचे तीव्रतम स्वरूप याच परगण्यात पहायला मिळते. अशा अवस्थेत निग्रोंबाबत उदार धोरण ठेवणाऱ्या जॉनला इथे विरोध व्हावा हे स्वाभाविक होते. नुसता विरोध नव्हता तर पराकाष्ठेचा द्वेष होता. जॉनच्या धोरणा-विरुद्ध इथे उठणारे पडसाद जॉनच्या हितचिंतकांना माहिती होते. म्हणूनच त्यांनी त्याला सल्ला दिला होता, " आपणांविरुद्ध टेक्सासमध्ये फार मोठ्या प्रमाणावर विरोधी वातावरण निर्माण झालं आहे. आपण अशा वेळी तिथं गेला नाहीत तर बरे होईल. " जॉनने शांतपणे हा सल्ला ऐकून घेतला. पण आतापर्यंत पूर्ण विचार करून बेधडक उडी घेणे त्याला माहिती होते. विचार करत बसणे किंवा काचकूच करणे, माघार घेणे याची त्याला सवय नव्हती. त्याने निर्भयपणे उत्तर दिले, " अमेरिकेचा लोकसत्ताक अध्यक्ष अमेरिकेतल्याच एखाद्या शहरात जाऊ शकत नाही, ही गोष्ट मला नामुष्कीची आणि भ्याडपणाची वाटते. "

आणि मोठ्या विश्वासाने तो टेक्सासच्या सान अँटोनियो इन्टर-नॅशनल विमानतळावर आला. विमान खाली उतरले, धावपट्टीवर थांबले, भराभर शिडी लावली गेली. विमानतळावर खूप मोठा स्त्रीसमूह जमला होता. त्यांनी जॅकीच्या नावाचा जयघोष सुरू केला आणि मग सर्व दर्शकातून जॅकीच्या स्वागताचे ललकार उमटू लागले. अमेरिकेच्या अध्यक्षाच्या या देखण्या पत्नीचे अमेरिकन जनतेला अमाप कौतुक होते, प्रेम होते आणि आकर्षणही होते. विमानाचे दार हलकेच उघडले गेले आणि किंचित् लाजरे, संकोची पण मोहक स्मित करत अमेरिकेची " फर्स्ट लेडी " दारात उभी राहिली. उत्कृष्ट पोषाख, रेखीव आणि डौलदार आकृती आणि सुसंस्कृत, सुविद्य, खानदानीपणाचे तेज ल्यालेली ती लावण्यवती पाहताच जमावाने जोरजोराने गर्जना सुरू केल्या. तिच्या पाठोपाठच सडपातळ आणि चपळ अशी जॉन केनेडीची मूर्ती येऊन उभी राहिली. स्मितहास्याने सर्वांच्या स्वागताचा स्वीकार करीत जॉन आणि जॅकी निवासस्थानाकडे रवाना झाली. जॉनपेक्षाही 'जॅकी' अतिशय लोकप्रिय होती असे म्हणायला हरकत नाही. ते 'राईस' हॉटेलमध्ये उतरले होते. त्या हॉटेलच्या बाहेर जो जमाव जमला होता, त्यातल्या लोकांना वृत्तपत्राच्या एका वार्ताहराने प्रश्न केला, 'तुम्ही येथे कशासाठी आले आहात ?' गर्दीतल्या बहुतेक साऱ्यांनी 'आम्ही जॅकीला पाहायला आलो आहोत.' असे उत्तर दिले. काहीजण दोघांनाही पाहायला आले होते. जॅकेलीनच्या लोभस व्यक्तिमत्वाने जॉनची लोकप्रियताही मागे सारली होती.

दलासला जॉन केनेडी आणि दलासचा गव्हर्नर कॉनली यांच्यात सारा दिवस चर्चा चालली होती. जॅकी सगळे पाहात होती, ऐकत होती. शेवटी न राहवून ती एकदा जॉनला म्हणाली, 'काही म्हणा बाई, पण मला तुमचा हा गव्हर्नर कॉनली आवडला नाही.'

जॉनने आश्चर्याने विचारले, 'का ग ?'

'तसं नक्की काही सांगता येत नाही, पण तो किनई सारखा स्वतःचा मोठेपणा मिरवताना दिसतो. तुमच्यावर आपल्या कर्तृत्वाची छाप

पाडायचा तो सारखा प्रयत्न करतोय. त्यांच्या बोलण्यात अहंमन्यता आहे. अगदी उघड दिसतंय ते.'

जॅकी अगदी एखाद्या लहान मुलासारखी तक्रार करीत होती. जॉन हसून समजावणीच्या स्वरात म्हणाला, 'असं करू नये जॅकी. अगं, एखाद्या माणसाबद्दल मनात एकदा का अढी बसली, की ती प्रत्येक वेळी वागण्यातून, हालचालींतून व्यक्त होत राहते. तू कॉनलीचा राग धरलास, की त्याच्याबरोबर बोलताना, वागताना तुझी त्याच्याबद्दलची नाराजी सारखी व्यक्त होत राहील. तसं बरं दिसत नाही. शिवाय कॉनली खरोखरच वाईट नाही. इथल्या कित्येक उद्योगपतींबरोबर त्यानं समजुतीनं वागून त्यांना आपल्या बाजूला वळवायचा अतोनात प्रयत्न केला आहे हेच तो मला पटवून देत होता. त्यात त्याचं काय चुकलं? आणि असं बघ, इथल्या लोकांवर माझ्यापेक्षा त्याची अधिक छाप पडली. तो माझ्यापेक्षा जास्त जवळचा वाटू लागला तर आपलं कोणतं नुकसान होणार आहे? देशाच्या दृष्टीने ते लाभदायक नाही का?'

आपला पती विलक्षण संयमी, उदारमनस्क, समजूतदार आणि देशापुढे स्वतःची किंमत कमी लेखणारा आहे याची जॅकीला पुन्हा एकवार खात्री पटली. जॉन स्वतःविषयी कितीही बेफिकीर असला आणि मनाने निर्भय असला तरी सरकार मात्र बेफिकीर नव्हते. दोन दिवसांच्या या मुक्कामात गुप्त पोलिसांचा पहारा सतत जागता होता. जवळजवळ सगळे गुप्त हेर खाते या वेळी डोळ्यात तेल घालून रात्रंदिवस जागे राहिले होते. पण त्यांच्या नजरेपलीकडे कुठेतरी एका कोपऱ्यात भवितव्यता आपले भीषण जाळे विणत बसली होती.

दलासमधल्या ज्या रस्त्याने आज अध्यक्षांची मिरवणूक जायची होती, त्या रस्त्यावरून सारा दिवसभर मोटारींची सारखी धावाधाव चालली होती. या हजारो मोटारींपैकी एका मोटारीतून मार्गारेट क्रेबरी ओसवाल्ड या नावाची एक नर्सही चालली होती. तीन ते अकरापर्यंत तिची हॉस्पिटलमध्ये पाळी होती. ती रात्रपाळी संपवून थॉमस प्लेसमधल्या आपल्या

ब्लॉककडे चालली होती. मार्गारेट या स्त्रीचे व्यक्तित्व नकोशा वाटणाऱ्या कित्येक गोष्टींनी घडवलेले होते.

वय ५६, पिचका आणि सदोदित तुरबुरलेला आवाज ही तिची वर्णनातली वैशिष्ट्ये. याबरोबरच तिच्या बोलण्यातून पैसा आणि प्रतिष्ठा यांबद्दलचे कौतुक अखंड ओसंडत असे. कारण या दोन्ही गोष्टी तिच्याजवळ नव्हत्या. तीन वेळा लग्न करूनही ही बाई आयुष्यात सुखी झाली नव्हती. एक नवरा मरून तिच्या तावडीतून सुटला होता. बाकी दोघेजण तिला टाकून मोकळे झाले होते आणि अखेर एका हॉस्पिटलमध्ये लोकांची घाण उपसत तिला बसावे लागले होते. यासाठी तिला फारसा पैसा मिळत नव्हता. पण जे काही मिळत असे तेवढया तुटपुंज्या मिळकतीचाही तिला दांडगा अहंकार होता. स्वत:च्या चिक्कू वागणुकीचे आणि स्वभावाचे ती सतत समर्थन करत असे. तिला या गोष्टीचा दांडगा अभिमान होता. आपल्या मातृदेवतेचे हे सर्व " सद्‌गुण " ली हार्वे ओसवाल्ड या तिच्या ' सुपुत्राने ' जसेच्या तसे उचलले होते. आई आणि मुलगा या दोघांच्या स्वभावात आणि प्रवृत्तीत फार साम्य होते. लीचा जन्म झाल्यावर अवघ्या दोन महिन्यांतच लीचा बाप मरण पावला. वास्तविक अशा वेळी आई आणि मुलगा यांच्यात अधिक जवळीक, ओढ, प्रेम निर्माण व्हायला हवे. पण इथे उलटेच झाले. आई नेहमी नोकरीसाठी किंवा इतर कामासाठी बाहेर जात असे. ली घरातच असायचा. त्याचे मित्र त्याच्या आईला कधी आवडत नसत. त्यामुळे लीला फारसे मित्रही मिळू शकले नाहीत. तो दिवसाचा बराच वेळ एकटा रहात असे. दिवसच्या दिवस असे एकटेपणात घालवल्यामुळे ली माणूसघाणा—" माणूसद्वेष्टा " बनला. खरे प्रेम, माया या दोन्ही गोष्टींची त्याला कधी कल्पनाच आली नाही. वास्तविक त्याचा सर्वसामान्य बुद्धीचा निर्देशांक अतिशय उच्च होता. पण त्याने फार शिक्षणच घेतले नाही. नवव्या इयत्तेतून त्याने शाळा सोडली आणि तो मरीन कोअरमध्ये भरती झाला. मरीन कोअरमधले त्याचे सगळे सहकारी त्याला " मित्रा ससा " या नावाने हाक मारत. मरीन कोअरमधला शिक्षणक्रम हा जगातला अति-उत्कृष्ट असा शिक्षणक्रम समजला जातो. पण इथे राहूनही ओसवाल्ड

दुसरेतिसरे काही शिकला नाही. नाही म्हणायला फक्त बंदूक चालविण्यात तेवढे त्याने प्राविण्य मिळविले. एवढे एकच कौशल्याचे काम तो आयुष्यात शिकला. मरीन कोअरमध्ये ली ओसवाल्ड टिकू शकला नाही. त्याच्या स्वभावानुसार त्याला इथे आलेले अनुभव निराशाजनक वाटले. १९५९ साली तो आपला शिक्षणक्रम सोडून रशियात निघून गेला. पण तिथूनही त्याला हाकलून दिले गेले. ओसवाल्ड अमेरिकेला परत आला. यानंतर त्याला सतत अपयशाच्या चक्रात फिरत रहावे लागले. मग त्याने हॅवानाला जायचा प्रयत्न केला. पण क्यूबाने त्याला पासपोर्टही दिला नाही. या सर्व गोष्टींचा निष्कर्ष एवढाच होता की, ली हॉर्वे ओसवाल्ड ही अत्यंत नकोशी असलेली व्यक्ती होती. कुणालाही तो नको होता.

जॉन केनेडी आणि ली ओसवाल्ड यांच्यात कोणतेच साधर्म्य नव्हते. एक तेजस्वी सूर्यकिरण तर दुसरा नुसता राखेचा ढिगारा ! जॉन केनेडीजवळ अफाट संपत्ती, यशाचा पर्वत, देखणी पत्नी, कौटुंबिक सौख्य, लोकप्रियता या गोष्टी उदंड होत्या, तर ओसवाल्डजवळ यातले काहीही नव्हते. केनेडी स्वतः देखणा, तर ओसवाल्ड टकल्या आणि गबाळ्या रूपाचा. ओसवाल्डचा आवाजही नैसर्गिक मर्दानी नव्हता. चिरका आणि विचित्र होता. युद्धकाळात केनेडी लष्करात होता तेव्हा एक शूर अधिकारी मानला जात होता. याउलट शांततेच्या काळातही ली ओसावाल्डला एकदा गुन्ह्यासाठी लष्करी कोर्टासमोर खेचण्यात आले होते. केनेडीला अमर्याद सत्ता मिळाली होती. लोक त्याचा जयजयकार करत होते. जनता त्याच्या-वर अलोट प्रेम करत होती. याउलट ओसवाल्ड लोकांना नकोसा होता. सारेजण त्याची उपेक्षा करत होते, हाड्हाड् करत होते, दूर लोटत होते.

लहानपणापासूनच ओसवाल्डला "पॅरानोइया" या नावाची एक मानसिक विकृती जडत चालली होती. या मानसिक विकृतीमुळे माणूस अधिकाधिक आत्मनिंदक बनू लागतो स्वतःचा स्वतःच तिरस्कार, घृणा करू लागतो. अखेर या आत्मनिंदेच्या तीव्र चटक्यांनी तो अंध बनतो, विवेक नाहीसा होतो, कोणावर तरी सूड उगवावा असे त्याला

सारखे वाटत रहाते. एक प्रकारची सूड उगवण्याची आसुरी लालसा त्याच्या मनात निर्माण होते.

त्याची बायको मरीना कम्युनिस्ट होती. लीला वाटत होते की, आपण गरीब असलो तरी मरीनाला त्याचे दु:ख वाटणार नाही. ती आपली उपेक्षा करणार नाही. पण तिथेही तो कमनशिबी ठरला. मरीना त्याला सतत पैशासाठी तंग करत असे. त्याची कुचेष्टा करत असे. त्याला काम करायला नको, महत्त्वाकांक्षा नाही असे साऱ्यांना सांगत असे.

२२ नोव्हेंबरचा दिवस उजाडला. सकाळी मरीना नेहमीप्रमाणेच उठली. आपल्या मुलीला तिने अंघोळ घातली, कपडे घातले. त्या वेळी ली कामावर जायचा पोषाख करून दारात उभा राहिला आणि तिला म्हणाला, " कितीदा तेचतेच सांगू. तुझ्यासाठी आणि ज्युनीसाठी कपडे आणि बूट विकत घ्यायला खरोखरच जा. "

पण मरीनाने त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. जणू तिला म्हणायचे होते, " पुरे झाल्या लंब्याचौड्या गप्पा, खिशात नाही दमडा्न्‌.... "

ली ओसवाल्डने कामावर जाण्यापूर्वी आपली लग्नातली अंगठी काढून कपाटात ठेवली. आज त्याच्या दुर्दैवाचे दशावतार संपणार होते. त्याचे कमनशीब प्रसन्न होऊन त्याला यश देऊन जाणार होते. त्याच्याजवळही पराक्रम आहे असे सिद्ध होणार होते. त्याने बंदूक आणि दुर्बीण एका ब्राऊन कागदात गुंडाळून बरोबर घेतली आणि तो गाडीत बसला. त्याच्या बरोबर वेस्ली फ्रेझिअर होता. त्याने लीला विचारले, " काय रे ली, ते बंडल कसलं घेतलंस् बरोबर ? "

" ते ना ? ते साधे लोखंडी कांबीचे तुकडे आहेत. " लीने उडवाउडवी केली. गाडी पुढे निघाली.

जॉन केनेडीने त्या दिवसाची सर्व वर्तमानपत्रे मुद्दाम चाळली. आपल्या कालच्या भेटीची लोकांवर प्रतिक्रिया काय झाली आहे ते त्याला

जाणून घ्यावयाचे होते. बहुतेक वर्तमानपत्रांत त्याच्याबद्दलचा उपरोधिक सूर स्पष्ट दिसत होता. एका वर्तमानपत्राने त्याच्या क्यूबासंबंधीच्या धोरणावर कडाडून हल्ला चढवला होता आणि लिहिले होते, "व्हिएटनाममध्ये आमच्या हजारो अमेरिकन सैनिकांची कम्युनिस्ट लोक कत्तल करीत आहेत. कम्युनिस्ट शिपायांची पोटे त्यावर भरत आहेत. हजारो क्यूबन लोकांना कैद केले जात आहे, उपाशी मारले जात आहे. या सगळ्याला जॉन केनेडी जबाबदार आहे. आम्हांला असा संशय येतो की, कम्युनिस्ट सैनिकांची पोटे भरावीत म्हणून जॉनने रशियाच्या कम्युनिस्ट पक्षाशी गुप्तपणे हातमिळवणी करून लढाई चालू ठेवली असावी." जॉन हे वाचून भयंकर संतापला, अस्वस्थ झाला. आपला राग त्याने जॅकीच्या प्रायव्हेट सेक्रेटरीवरच काढायला सुरुवात केली. पण एवढ्यात चाकाच्या खुर्चीवर बसून एक वृद्धा त्याच्यासमोर आली. आपला राग चटकन् दाबून टाकून तो त्या वृद्ध स्त्रीशी हळूवारपणे बोलू लागला. आपल्या भावनांवर त्याचे विलक्षण नियंत्रण होते.

बाहेर झिमझिम पाऊस पडत होता. पण जॉन आपला राग विसरून पुन्हा प्रफुल्लित झाला होता. मात्र त्याच्याखेरीज इतर सगळ्यांची मनःस्थिती मात्र फारशी चांगली नव्हती. कसल्यातरी चिंतेत चूर झाले होते सारेजण. जॉन्सन यांनी वृत्तपत्राच्या लोकांना अभिवादन केले. पण ते नुसते वरवरचे, कृत्रिम वाटले साऱ्यांना. बाहेर पावसाचे तुषार उधळत असल्याने जॅकीला मात्र जरा बरे वाटले. जाताना गाडीचा टप पाडला जाईल असे तिला वाटले होते. सगळ्या धावाधावीने आणि अपत्याच्या मृत्यूच्या दुःखाची आठवण मनात ताजी असल्याने तिचा चेहरा कोमेजला होता. चेहऱ्यावरचे तेज थोडेसे मावळले होते. आपण अशा विषण्ण अवस्थेत, उदास चेहऱ्याने लोकांच्या दृष्टीला पडलो तर आपल्या नवऱ्याला ते कमीपणाचे ठरेल असे तिला वाटत होते. म्हणून बंद गाडीतून प्रवास व्हावा अशी तिची इच्छा होती. ही एवढी मिरवणूक पार पडल्यावर ते न्यूयॉर्कला जाणार होते. जॅकी मनातून प्रफुल्लित झाली होती. दोन आठवड्यांनी कॅलिफोर्नियाला जायचे जॉनने ठरवले होते. जॅकीनेही त्याला एकदम मान्यता देऊन टाकली होती. हॉटेलची खोली आज निरनिराळ्या छोट्यामोठ्या कलाकुसरीच्या

ग्र. क्र. 92486 नों. दि. .
वि. ... (५१) वाकि दो ... ....

वस्तूंनी सुशोभित करण्यात आली होती. जॅकी कलाकौशल्याची भोक्ती होती, रसिक होती हे जाणूनच तिच्यासाठी खास ही व्यवस्था करण्यात आली होती. याच वेळी मॅक किल्डफने जॉनविरुद्ध टीकेचे गरळ ओकणारी वृत्तपत्रे आणून दाखवली. ती पाहताच जॅकीचा उत्साह किंचित मावळला. जॉन तिला सहजपणे म्हणाला, " खरं म्हणजे काल रात्री माझा खून करायला फार नामी संधी होती. " जॅकी त्याच्या या भयानक थट्टेने आणखीनच घाबरली. जॉन पुढे म्हणाला , " खरे सांगतोय मी. काल पाऊस फार पडत होता, शिवाय गर्दी खूप होती. एखाद्याने ब्रीफकेसमध्ये एखादे छोटे पिस्तुल लपवून आणले असते तरी कुणाला कळले नसते. " जॅकीच्या अंत:करणाचा थरकाप उडाला.

शहरातील मोटारमिरवणूक पार पडली. सगळेजण विमानतळाकडे निघाले पण या वेळी हवा चांगली पडली होती. पाऊस थांबला होता. त्यामुळे गाडीचा टप उघडून टाकला. दलासच्या लव्हफील्डवर हातांत निशाणे घेऊन कित्येक जण उभे होते. "आम्हांला जॉन केनेडी फार फार आवडतात" अशी अक्षरे असलेले कार्डबोर्डचे निशाण एका निग्रो मुलाने उंच धरले होते.

ली ओसवाल्ड या वेळी टेक्सास स्कूल बुक डिपॉझिटरीच्या सहाव्या मजल्यावरच्या खिडकीत उभा होता. सबंध इमारतीत त्याच्याकडे कुणी निरखून पाहिले नाही. कुणी हटकले नाही. त्याच्या हालचालींचा संशयही कुणाला आला नाही.उलट तिथून बारा फुटांवर उभ्या असलेल्या एका पोलिस अधिकाऱ्याला वाटले, " आजूबाजूच्या इमारतींत सर्वत्र गुप्त पोलिस भरलेले आहेत. त्यांतलाच हा एक दिसतोय. आणि खिडकीतून शांतपणे लक्ष ठेवत आहे " आपल्या बायकोलाही त्याने तसेच सांगितले. ली ओसवाल्ड एखाद्या पुतळ्यासारखा स्तब्ध राहून दूरवर अपलक नजरेने पहात होता. जवळ जवळ साडेबाराच्या सुमाराला लांबून गर्दीचा आवाज आणि आरडा-ओरड ऐकू येऊ लागला. अमेरिकेचा अध्यक्ष जॉन केनेडी आपली भेट संपवून परत निघाला होता. लीने त्याला पाहिले. १२-३५ च्या सुमाराला मिरवणूक बुक डिपॉझिटरीच्या रस्त्यावरून चालली होती. मॅक किल्डफ मरियन स्मिथला विचारत होता, " बुक डिपॉझिटरी म्हणजे

काय असतं?" जॉनच्या सेक्रेटरी मिसेस एलव्हिन लिंकन सुटकेचा निःश्वास टाकत म्हणत होत्या, "झालं बाई एकदांचं, सबंध दलास शहरातून फिरून आलों. पण एकही निदर्शन झाले नाही हे आश्चर्यच." एमरी रॉबर्ट्स हिशेब करू लागला, "आता फक्त पाच मिनिटं उरलीत. तेवढी झाली, की हे लटांबर सुखरूप पार पडलं म्हणायचं."

एका झाडाखालून गाड्या पुढे हालल्या, एवढ्यात एका पाच वर्षांच्या छोट्या मुलाने भीतभीत जॉनला हात उंच केला. जॉननेही हसून त्याचा स्वीकार करण्यासाठी हात वर केला. हात वर होतो न होतो तोच एकाएकी कसलातरी विलक्षण आवाज झाला. सगळेजण भयचकीत झाले. कोणाला काही कळेना. पण जेव्हा लक्ष्यात आले तेव्हा ते सत्य किती भीषण होते हे कळून सगळेजण निःस्तब्ध झाले. या आवाजापाठोपाठच जॉन पुढे झुकून खाली कोसळताना सगळ्यांना दिसला. आपली मान आवळून धरत खाली कोसळताना जॉन कळवळून म्हणाला, "देवा रे,मला गोळी घातली." आणि याच वेळी कॉनलीच्या पाठीतून, छातीतून, उजव्या मनगटातून आणि डाव्या मांडीतून रक्ताची धार उसळली. तो किंचाळू लागला, "बापरे, आम्हांला दोघांनाही ठार करायचा बेत दिसतोय."

जॅकीला अद्याप झाल्या घटनेची कल्पनाच आली नव्हती. कॉनली किंचाळायला का लागला आहे याची चौकशी करत ती आपल्या नवऱ्याकडे वळली. याच वेळी ओसवाल्डने पुन्हा अचूक नेम धरला. कुरळ्या केसांच्या दाट पुंजक्यांनी त्याचे टिपण त्याला दुर्बिणीतून स्पष्ट दिसत होते. त्याने बंदुकीचा घोडा दाबला.

जॉनच्या चेहऱ्यावर विलक्षण वेदना उमटल्या. पूर्वीही कधी त्याला पाठीतून कळ आली, की अशा वेदना त्याच्या चेहऱ्यावर जॅकीने पाहिल्या होत्या. या वेळीही नेहमीप्रमाणे आपली केसांची झुलपं मागे सारण्यासाठी हात वर केला पण····तो हात पुरता वरपर्यंत न पोचताच लुळा होऊन खाली पडला. आपल्या मस्तकाला स्पर्श करण्यासाठी त्याने हात वर नेला होता. पण त्या मस्तकाच्या जागी········आता काहीच नव्हते. तिथे

गोळीने जॉनच्या मेंदूच्या खालच्या भागाच्या चिंधड्या उडवल्या होत्या. त्याच्या शरीरावर झुकून पहाणाऱ्या जॅकीला त्याच्या कवटीचा एक तुकडा अलग झालेला दिसला. प्रथम तिथे काही नव्हते. पण एकाएकी तिथून कारंज्यासारखी रक्ताची धार उसळली. जॅकीचे सारे अंग रक्ताने न्हाऊन गेले. ओठावर हात ठेवत काहीच न उमजून ती थरथरत्या आवाजात कळवळून ओरडली, 'ओ⋯नो.' बाजूला गुलाबाचे गेंद पडले होते. लाल निष्पाप रक्ताने ते माखून गेले. काही न सुचून जॅकी ढसाढसा रडत पुटपुटू लागली, 'देवा रे, माझ्या नवऱ्याला अखेर मारले त्यांनी. जॅक जॅक.'

नंतरचे तिला काहीच उमजले नाही. समजले नाही. तिला त्यातले काही आठवतही नाही. तिच्या नजरेसमोर सारा अंधार पसरला होता. गाड्या हॉस्पिटलकडे सुसाट धावत सुटल्या होत्या. घुसमटलेल्या आवाजात ती हुंदके देत होती. मधूनच पुटपुटत होती,

'ते आता मृत्यू पावलेत. नक्कीच⋯नक्कीच ते आता जिवंत नाहीत.'

• • •

वाचनालय शाखा.
नोंद दि

# ६

## आणि आकाशच कोसळले.........

मधूनमधून जॅकी थांबत होती. पण राहून राहून उमाळा आणखी-नच येत होता.

हातांच्या मिठीत जॉनचे खांदे कवटाळून जॅकी त्याच्या चेहऱ्यावर झुकून गदगदा रडत होती. अगदी एखाद्या सर्वसामान्य स्त्रीसारखी. आपण कुठे आहोत, काय करत आहो, आपल्या आजूबाजूला काय चाललेय् या कशाचाच तिला उमज पडत नव्हता. गाडी मात्र भरधाव हॉस्पिटलकडे निघाली होती.

जॅकीने मान खाली घातली होती. तिच्या मांडीवर जॉनचे रक्ताने माखलेले मस्तक होते. एकवार तिने दुःखाच्या आवेगाने कवटाळून धरले. 'साऱ्या लोकांची नजर आपल्याकडे लागली असेल, ते आपली कीव करत असतील' या जाणिवेने तिला वर पहायचेही धैर्य होत नव्हते. आजूबाजूच्या लोकांना फक्त तिचे दबलेले हुंदके ऐकू येत होते. इतकी भीषण शांतता सर्वत्र पसरली होती. क्लिंट हिलने हॉस्पिटलच्या दाराशी गाडी थांबताच तिच्या खांद्याला हलकेच स्पर्श करत म्हटले, "मिसेस केनेडी, अध्यक्षांना हॉस्पिटलमध्ये न्यायला हवं."

ती आवेगाने मान हलवून म्हणाली, "नाही, नाही. मी मुळीच नेऊ देणार नाही."

" असं करू नका. त्यांना डॉक्टरांकडे न्यायला हवं ना ? "

" मिस्टर हिल्, तुम्हांला माहिती आहे की, ते...आता ते जिवंत नाहीत. मग कशाला उगाच मला त्रास देता ? " जॅकीचा संयम दुःखाच्या आवेगाने सुटू लागला होता.

हॉस्पिटलमध्ये जॉनला सलाईन सोल्यूशन देत होते. तेव्हा बाहेरच्या खोलीत जॅकी स्तब्ध बसली होती. मनाला उगाचच एक वेडी आशा वाटत होती. कदाचित् अद्याप आशेला जागा असेल. डॉक्टर शर्थ करतील प्रयत्नांची. ते वाचले तर.......तिने परमेश्वराला साकडे घातले. " देवा, ते जगू देत. त्याची वाटेल ती किंमत द्यायला मी तयार आहे. "

पण तिच्या या वाटण्याला काही अर्थ नव्हता. आता तिची खात्री पटत चालली की, जॉन मृत्यू पावला आहे. आतापर्यंत जॉनच्या प्रत्येक आजारपणात डॉक्टरांनी तिला जॉनजवळ जाऊ दिले नव्हते. त्याचे पाठीचे ऑपरेशन चालले होते. तो तिला हाका मारत होता. तेव्हा देखील प्रयत्न करूनही तिला कुणी जाऊ दिले नाही. त्या वेळी स्पेशॅलिस्टचे उपाय अपुरे पडू लागले असे वाटताच तिने दुसरा स्पेशॅलिस्ट बोलावण्याचा विचार केला. पण तिला तसे करू दिले नाही कुणी. त्या ऑपरेशनच्या वेळी जॅकीला काढावे लागलेले ते भयाण, एकाकी, निराशामय असे चार महिने आठवून जॅकीला भडभडून आले. आपल्यापेक्षा डॉक्टरांना जास्त कळते असे समजून ती त्या वेळी गप्प बसली होती. पण त्यानंतर मात्र तिने शपथ घेतली, " यापुढे अशी वेळ कधी आली तर मी कुठेही दूर जाणार नाही. त्याला जरूरी असेल तेव्हा मी त्याच्याजवळ राहीन. "

आतासुद्धा जॉन आत मृत्यूशी झुंजत होता आणि बाहेर परिचारिका तिला अडवत होत्या. तिने कळवळून विनवले, " या क्षणी .......त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या या क्षणी तरी मला तिथे येऊ द्या हो. "

बर्कलेने ते पाहिले आणि गंभीरपणे परिचारिकेला म्हटले, " त्यांना आत जाऊ दे. त्यांचा हक्क आहे तो. "

हॉस्पिटलच्या गाडीत स्ट्रेचरवर जॉनचे शव आणून ठेवण्यात आले. डॉक्टरांनी त्याच्या सर्वांगावरून पांढरे वस्त्र झाकले. क्लार्क जॅकेलीनकडे वळला आणि गंभीर व जड आवाजात म्हणाला, " आपले पती मृत्यू पावले आहेत. " जॅकीचे ओठ थरथरत होते. तोंडातून शब्द फुटत नव्हता. पण चेहऱ्यावरचा केविलवाणा भाव सांगत होता, " होय ! मला माहिती आहे ते. "

काही मिनिटांच्या अवधीतच दूरवाणीवरून ही बातमी सर्वत्र पसरली. रॉबर्ट केनेडी जेवायला बसला होता. त्याच्याकडे काही पाहुणे आले होते. एवढयात फोनची घंटा खणाणली. डायरेक्टर जनरल हूव्हर बोलत होता, " मिस्टर केनेडी अध्यक्षांना कुणी तरी गोळी घातली आहे. " रॉबर्टच्या हातून फोन गळून पडला. त्याची बायको आणि पाहुणे जेवणाच्या टेबलाशी बसले होते. कसाबसा थरथरत रॉबर्ट जेवणाच्या टेबलाशी जाऊ लागला. मध्येच थबकून उभा राहिला. " जॅकला कुणीतरी गोळी घातली आहे " एवढेच गद्गदलेल्या आवाजात बोलून त्याने आपला चेहरा हाताच्या ओंजळीत लपविला आणि तो मटकन् खाली बसला.

लीझ पोझेनची मुलगी कॅरोलीनच्या वयाची होती. त्या दिवशी छोटी कॅरोलीन लीझच्या घरी एका रात्रीपुरती रहायला गेली होती. लीझने वॉशिंग्टन स्टेशन लावले आणि अचानक तिच्या कानांवर शिशाच्या तापलेल्या रसासारखे अर्धवट शब्द पडले, " मस्तकावर गोळी झाडली आणि त्यांची पत्नी जॅकी.... " लीझने ताबडतोब स्टेशन बंद करून टाकले. कॅरोलीनच्या कानांवर ही बातमी येऊ नये अशी तिची इच्छा होती. हेन्री गोंजालेज याने ही बातमी ऐकली आणि तो म्हणाला, " युनायटेड स्टेट्सचं सामर्थ्य आणि शक्ती एकाएकी अनपेक्षितपणे कोसळून पडली आहे असं वाटतं आहे. " सीनेटर बॅरी गोल्डवॉटर जॉनचा प्रतिस्पर्धी होता. पण त्याचे जॉनवर फार प्रेम होते. ही बातमी ऐकताच आपल्या सर्व जाहीर सभा त्याने रद्द करून टाकल्या.

विजेच्या वेगाने जॉनच्या मृत्यूची बातमी साऱ्या जगभर पसरली. अमेरिकेत प्रे. जॉन्सन यांनी त्याला श्रद्धांजली वाहताना म्हटले, " जॉन

केनेडी हा मानवाच्या आशेचा किरण होता. पाचही खंडांतील नवीन पिढीला मानवजातीच्या कल्याणाची आशा त्याने दाखविली आहे. त्याने हा मोठा वारसा दिला आहे. आपण त्याच्या मृत्यूबद्दल शोक करत बसून त्याच्या या वारशाची उपेक्षा करणे योग्य नाही. भूतकाळात घडलेल्या-बद्दल झगडा करत रहाण्यात त्याने वेळ घालविला नाही. उलट भविष्य-काळातले उंच मनोरे त्याच्या नजरेसमोर होते. त्याने जी स्वप्ने पाहिली ती प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करणे हे आपले काम आहे. "

जॉन केनेडीला श्रद्धांजली वाहताना प्रत्येक भारतीयाच्या मनातही असेच विचार आले. एकीकडे जगात हिंसक तत्त्वज्ञानाची लाट पसरली होती. अशा वेळी सद्सद्विवेक बुद्धीने वागून मानवतेची उपासना त्याने केली. कम्युनिस्ट लोकांत प्रामाणिकता, मानवता आणि चांगुलपणा हे गुण विरळा आहेत हे त्याला चांगले ठाऊक होते. पण तरी देखील कम्युनिस्ट देशाबरोबर मुद्दाम होऊन युद्ध ओढवून घेणे त्याला मान्य नव्हते. ऐक्य, सद्भावना आणि सामर्थ्य यातच स्वातंत्र्याचा खरा अर्थ लपलेला आहे अशी त्याची खात्री होती. माणसाला सुंदर जगाच्या निर्मितीसाठी, सुंदर गोष्टींच्या निर्मितीसाठी स्वातंत्र्याची मदत होते.

पंडित जवाहरलाल नेहरूंनी अमेरिकन जनतेला पाठविलेल्या संदेशात म्हटले, 'जॉन केनेडींची हत्या हा सबंध मानवतेविरुद्धचा गुन्हा आहे. आदर्शवादी, स्वप्नाळू, धैर्यशील, स्वतःच्या बांधवांबरोबर जगाच्या कल्याणाचा विचार करणाऱ्या या थोर माणसाचा ऐन तारुण्यातच आणि त्याचे कार्य अपूर्ण असतानाच अन्त झालेला आहे. मागासलेल्या देशांना आधुनिक विज्ञान आणि तंत्र यांचे फायदे त्याने उपलब्ध करून दिले. स्वातंत्र्याच्या राजरस्त्यावरून विकासाच्या मंदिराकडे जाणाऱ्या देशांना आपली शक्ती आणि सामर्थ्य यांची मदत दिली. त्यांचा देश धनवान होता. वैभवशाली होता. पण या संपत्तीचा विनियोग मानवतावादी आणि नीति-वादाच्या दृष्टिकोनातून करण्याचा त्याने आदर्श घालून दिला. लोकांच्या हृदयातली त्यांची मूर्ती त्यांच्या महान तत्त्वज्ञानाचे मार्गदर्शन सतत लोकांना करीत राहील. सर्व जगाचे आशेने आणि प्रेमाने भरलेले डोळे त्यांच्याकडे

लागले होते. अमेरिकेच्या अध्यक्षपदाला त्यांच्यामुळे शोभा आली. डौल आला. महानता आली. अब्राहाम लिंकनची स्मृती त्यांच्या रूपाने येते.

साऱ्या जगात शोकपूर्ण वातावरण पसरले होते. या वेळी जॉनचे अंत्यसंस्कार चालू झाले. जॉनची शवपेटिका घेऊन येणारी कॅडिलॅक जेव्हा दाराशी आली तेव्हा स्वतः जॅकेलीनच प्रेतवत झाली होती. केन-ओ-डोनेल तिच्याजवळ गेला आणि हलक्या स्वरात म्हणाला, 'मला आपल्याजवळ थोडं बोलायचं आहे.' त्याने तिला आपल्यामागून यायची खूण केली. ती चटकन् उठली. तिचा श्वास रोखला गेला. तिच्या लक्ष्यात आले. जॉनचे शव येऊन पोचले आहे, पण तिने ते पाहू नये अशी सर्वांची इच्छा आहे. तिला धक्का बसेल असे साऱ्यांना वाटत आहे. पण केनने तिला वचन दिले होते. काही झाले तरी शवपेटिका बंद होण्यापूर्वी तिला पतीचे अखेरचे दर्शन करून दिले जाईल. केनबरोबरच सर्जन क्लार्कही आला होता. तिने क्लार्कला अडखळत आर्जवाने विचारले, 'मी आत जाऊ का?'

क्लार्क गोंधळून गेला. त्याला हो म्हणावे की नाही म्हणावे हे उमजेना. जॅकीला धीर निघेना. तिच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर लोटला. मान हलवत ती म्हणाली, "डॉक्टर, केवळ शवपेटीला बघून मी खाली कोसळेन अशी तुम्हांला भीती वाटते का? अहो, ते ज्या वेळी बंदुकीच्या गोळ्या झाडल्या गेल्या त्या वेळी ते माझ्या अगदी निकट होते. त्यांच्या मस्तकाच्या चिंधडया उडाल्या तेव्हा ते माझ्याच मांडीवर कोसळले होते. त्यांच्या सर्व रक्ताचा सडा माझ्या शरीरावर शिंपडला गेला होता. डॉक्टर, यापेक्षा अधिक भीषण आणि दुःखदायक अशी जगातली कोणती गोष्ट बघायची माझी शिल्लक आहे?"

क्लार्क मुकाट्याने बाजूला झाला. ओनिलच्या पाठोपाठ व्हरांड्यातून जाताना तिच्या मनात विचार येत होते. आपल्या प्रिय पतीचा आत्मा स्वर्गाला चालला आहे. त्याच्यासाठी शेवटची अशी अमूल्य कोणती भेट द्यावी? तिला चटकन लग्नातल्या अंगठीची आठवण झाली. त्या अंगठी-इतकी अमूल्य अशी कोणतीच वस्तू आता तिच्याजवळ शिल्लक नव्हती.

लग्नाच्या वेळी जॉनची फार घाई उडाली होती. त्या गर्दीत अंगठीऐवजी एक साधे असे वळे आणले होते. त्यावर तारीखही टाकणे त्याला शक्य झाले नाही. पण ते साधे वळेही जॅकीचे सर्वस्व होते. ती शवपेटिकेजवळ गेली.

आपला हातमोजा तिने काढला. हातातली अंगठी काढली. अतिशय आदराने तिने आपल्या पतीचा हात हलकेच उचलला. तिची बोटे थरथरत होती. आतून दुःख सहस्र मार्गांनी बाहेर येऊ पहात होते. कसेबसे ते उरात दाबून तिने ती अंगठी त्याच्या थंडगार बोटावर चढवली. आजूबाजूला भयाण शांतता होती. पण जॅकीला काही उमजत नव्हते. डोळ्यांसमोर अश्रूंनी पडदा धरला होता. तिला काहीच दिसत नव्हते. कशीबशी बाजूच्या एका खुर्चीवर ती जाऊन बसली, केविलवाणेपणाने एखाद्या घायाळ सशासारखी !

◆ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ... वि ...
क्रमांक ... नोंद दि ...

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र ... नों दि ...
वि. ... क्र. ...

IRBK-0112548